



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२८ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -७


## जनगणना पुढील वर्षीपासून होण्याची शक्यता लोकसभा मतदारसंघांवर मोठा परिणाम होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

देशातील जनगणना पुढील वर्षीपासून सुरु होण्याची शक्यता आहे. दर १० वर्षांनी होणारी जनगणना २०२१ मध्ये होणे अपेक्षित होते. परंतू ती आता २०२५ ला सुरु केली जाणार आहे. यामुळे त्यापुढील जनगणना ही २०३५ ला होणार आहे.



कोरोनामुळे २०२१ ला अपेक्षित असलेली जनगणना टाळण्यात आली होती. यामुळे जनगणनेचा १९९१, २००१, २०११ असे दर दहा वर्षांचे चक्र बदलले आहे. २०२५ ला सुरु होणारी जनगणना ही २०२६ पर्यंत चालणार आहे. या जनगणनेमुळे लोकसभेच्या जागा वाढविण्याचा रस्ता देखील मोकळा होणार आहे.

केंद्र सरकारच्या वरिष्ठ पदावरील सूत्रांनुसार पुढील जनगणनेचे आकडे २०२६ मध्ये जाहीर केले जाणार आहे. जनगणनेची माहिती नोंद करण्याची प्रक्रिया २०२५ मध्ये सुरु होणार आहे. जनगणना झाल्यानंतर लोकसभेच्या जागांचे सीमांकन सुरू होईल. लोकसभेच्या मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा, त्यांची संख्या वाढविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले आहे. २०२८ पर्यंत सीमांकन पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सरकारने जातीय जनगणनेचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. याची मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत आहेत. या जनगणनेमध्ये धर्म आणि वर्गाचा विचार केला जातो. परंतू यावेळी लोकांना त्यांचा पंथही विचारला जाण्याची शक्यता आहे. जनगणनेमध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि जमातीची गणना केली जाते. पण यावेळी लोकांना ते कोणत्या पंथाचे अनुयायी आहेत असा प्रश्नही विचारला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, कर्नाटकात लिंगायत जे सामान्य श्रेणीतील आहेत, ते स्वतःला एक वेगळा पंथ मानतात. त्याचप्रमाणे वाल्मिकी, रविदासी इत्यादी अनुसूचित जातींमध्ये विविध पंथ आहेत. म्हणजेच धर्म, वर्ग आणि पंथाच्या आधारावर जनगणना करण्याच्या मागणीवर सरकार विचार करत आहे.

## कोथरूडमधून चंद्रकांत पाटलांचा रस्ता मोकळा; बालवडकरांचा बंडखोरीचा निर्णय मागे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८पुणे**

पुण्यात भाजपच्या वतीने कोथरूड मतदार संघातून चंद्रकांत पाटील यांचं नाव चर्चेत असताना अमोल बालवडकर यांनीसुद्धा भाजपकडून विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावरून भाजपमध्ये उमेदवारीवरून रस्सीखेच सुरु झाल्याचे दिसून आले होते. बालवडकर यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन चंद्रकांत पाटील यांच्यावर आरोप केला होता. मी कोथरूड मतदार संघातून इच्छुक असल्याने चंद्रकांतदादा माझ्यावर नाराज असल्याचे त्यांनी सांगितले होते. पक्षाने जर मला उमेदवारी नाही दिली, तर मग मला माझ्या जनतेसाठी वेगळा निर्णय घ्यावा लागेल, असे सांगत बंडखोरीचा इशारा दिला होता. अखेर त्यांनी हा निर्णय मागे घेतल्याचे दिसून आले आहे.



कोथरूड मतदार संघात पाटील प्रचार करत असताना बालवडकर आणि त्यांची भेट झाली. त्यावेळी दोघांनी नाराजी बाजूला ठेवून एकमेकांना पेढा भरवत शुभेच्छाही दिल्या. यावरून अमोल बालवडकर यांनी माघार घेतल्याचे समजते आहे. बाहेरचा उमेदवार नको अशी वेळोवेळी भूमिका मांडूनही तिसऱ्यांदा चंद्रकांत पाटलांचीच उमेदवारी देण्यात आली. स्थानिक असलेले अमोल बालवडकर यांनी आपल्याला उमेदवारी न मिळाल्यास बंडखोरी करण्याचे संकेत दिले होते. रविवारी सकाळीच भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बालवडकर यांच्या निवासस्थानी जात त्यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. यानंतरही यादीची वाट पाहू, असे वक्तव्य बालवडकर यांनी करत नाराजी कायम असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. रविवारी दुपारी भाजपाची पहिली यादी आली आहे. यामध्ये चंद्रकांत पाटलांचे नाव आहे. यामुळे बालवडकर बंडखोरीचा निर्णय घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बावनकुळेंच्या भेटीनंतरही बालवडकर हे निवडणूक लढण्यावर ठाम होते. बालवडकर यांनी बंडखोरी केल्यास चंद्रकांत पाटलांची मोठी अडचण होण्याची शक्यता होती.

## भाजपाची २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर

### ३ विद्यमान आमदारांचे तिकीट कापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं तिसरी यादी जाहीर केली आहे. पहिली यादी ९९ उमेदवारांची, दुसरी यादी २२ उमेदवारांची यापाठोपाठ भाजपानं आज तिसरी यादी २५ उमेदवारांची जाहीर केली आहे. त्यामुळे आता महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाकडून १४६ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मोर्शी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून देवेंद्र भुयार यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आता भाजपानंही या मतदारसंघातून उमेश यावलकर यांना उमेदवारी दिली आहे.




**तीन विद्यमान आमदारांना तिकीट नाकारलं!**

भाजपनं आज जाहीर केलेल्या उमेदवार यादीमध्ये तीन विद्यमान आमदारांची तिकिटं कापल्याचं दिसून येत आहे. त्यात आर्णीतून संदीप दुर्वे यांच्याऐवजी राजू तोडसाम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपूर मध्यमधून विकास कुंभारे यांच्याऐवजी प्रवीण दटके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. आर्वीतून दादाराव केचे यांच्याऐवजी सुमीर वानखेडे यांना तिकीट देण्यात आलं आहे.भारतीय जनता पक्षानं तिसरी यादी जाहीर केल्यानंतर आता महायुतीच्या जागावाटपाच्या फॉर्म्युल्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून मोर्शी विधानसभा मतदारसंघातून देवेंद्र भुयार यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतरदेखील भारतीय जनता पक्षानं आपल्या उमेदवार यादीमध्ये मोर्शीतून उमेश यावलकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

**प्रकाश मेहता, गोपाळ शेट्टींना उमेदवारी नाकारली**

घाटकोपर पूर्वमधून प्रकाश मेहता उमेदवारीसाठी इच्छुक होते असं सांगितलं जात आहे. मात्र, त्यांना तिकिट नाकारून भाजपानं पुन्हा पराग शाह यांनाच उमेदवारी दिली आहे. तसेच, बोरीवलीमधून गोपाळ शेट्टी उमेदवारीसाठी इच्छुक असताना संजय उपाध्याय यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. काँग्रेसमधून भाजपात आलेल्या अर्चना पाटील चाकूरकर यांना लातूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे.

## बसप, वंचित पुन्हा मैदानात; मतविभाजनामुळे, काँग्रेस, भाजपच्या तोंडचा घास पळविणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नागपूर**

शहरातील सहा विधानसभा मतदारसंघांत अनेक वर्षांपासून भाजप आणि काँग्रेस यांच्यातच खरी लढत होत असली तरी बहुजन समाज पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीनेही यात उडी घेतल्याने सर्व लढती रंजक झाल्या आहेत. बसप अनेक वर्षांपासून नागपूरच्या सहाही मतदारसंघांत उमेदवार देत असून २०१९ पासून वंचितही रिंगणात आहे. या दोन्ही पक्षांनी घेतलेल्या मतांची गोळाबेरीज केली असता प्रमुख पक्षांना यांच्या मतविभाजनाचा कायम फटका बसला किंवा फायदा झाला आहे. त्यामुळे यंदा मतविभाजनाबाबत भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्षांनी सावध भूमिका घेतली आहे.

**दलित मतदार निर्णायक भूमिकेत**



नागपूरच्या सहा विधानसभा मतदारसंघांत दलित मतदारांची संख्या मोठी आहे. उत्तर नागपूर मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव असला तरी इतर मतदारसंघातही दलित मतदार निर्णायक भूमिकेत आहेत. हा मतदार अनेक वर्षे काँग्रेससोबत राहिला. मात्र, बसप आणि वंचितच्या आगमनानंतर हा मतदार त्यांच्याकडे वळला. त्यामुळे भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या विजय आणि पराजयात बसप आणि वंचितचे मतविभाजन महत्त्वाचा घटक ठरतो. महाराष्ट्रात बसपने अनेक वर्षांपासून स्वबळावर निवडणुका लढवल्या आहेत, तर २०१९ पासून वंचित बहूजन आघाडीने उमेदवार देण्यास सुरुवात केली.

**या बड्या नेत्यांचा पराभव**

२०१४ मध्ये उत्तर नागपूर विधानसभा मतदारसंघातून बसपचे किशोर गजभिये यांनी काँग्रेसपेक्षा अधिक मते घेतली होती. यावेळी भाजपचे डॉ. मिलिंद माने विजयी झाले होते. २०१९ मध्ये डॉ. नितीन राऊत यांचा २० हजार मतांनी विजय झाला होता. यावेळीही बसपचे सुरेश साखरे यांनी २३ हजार तर वंचितचे विनय भांगे यांनी ५५९९ मते घेतली होती. पश्चिम नागपूर मतदारसंघात काँग्रेसचे विकास ठाकरे यांचा केवळ ६ हजार मतांनी विजय झाला. या मतदारसंघातून बसपच्या उमेदवाराने ८४०० मते घेतली होती. या दोन्ही पक्षांमुळे होणारे मतविभाजन टाळण्यावर काँग्रेसकडून भर दिला जाईल, तर मतविभाजनाचा लाभ करून घेण्यावर भाजपचा जोर राहील, असे दिसते.

## संजय राऊतांनी जागावाटपावर बोलणं बंद करावं, त्यापेक्षा...तोफ विरोधकांकडे डागली पाहिजे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नागपूर**

नागपूर विभागात ठाकरे गटाला १ जागा मिळाली त्यावरून नाराजी असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत मत आहे. आम्हाला कोकणात काहीच मिळालं नाही असं आम्ही म्हणायचं का? संजय राऊतांनी हा विषय बंद केला पाहिजे, आपल्याला विरोधकांच्या विरोधात लढायचं आहे ही भूमिका आपण घेतली पाहिजे. संजय राऊतांनी आता आपली तोफ विरोधकांकडे डागली पाहिजे हा माझा प्रेमाचा सल्ला आहे असं विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संजय राऊतांबाबत केले आहे.

पत्रकार परिषदेत नाना पटोले म्हणाले की, सोलापूर दक्षिणबाबत आमच्या हायकमांडने घेतलेला निर्णय आहे. त्याबाबतीत चर्चा होईल. राज्य म्हणून त्यावर प्रतिक्रिया दिली नाही. तिकिट वाटपानंतर काही नाराज होतील. हा प्रक्रियेचा भाग आहे. महाराष्ट्र मोठा आहे. ३ पक्षांची आघाडी आहे. मित्रपक्ष आहेत. त्यामुळे काही जिल्ह्यात एखाद्या पक्षाला जागा मिळणार नाहीत. जवळपास १०-१२ जिल्ह्यात आम्ही उमेदवार दिले नाहीत. संघटना हा महत्त्वाचा भाग आहे. परंतु महाराष्ट्र वाचवणे हे दायित्व जास्त आहे. महाराष्ट्र महायुतीच्या हातात गेला तर पूर्ण महाराष्ट्र विकून गुजरातचं नियंत्रण महाराष्ट्रावर आले असं होईल असं त्यांनी सांगितले.



तसेच राष्ट्रीय पक्ष असतील मग भाजपा असो वा काँग्रेस..त्यांना मित्रपक्षांना सांभाळणे ही राष्ट्रीय पक्षाची जबाबदारी असते. कार्यकर्त्यांच्या वेदना माहिती आहेत. आघाडी महत्त्वाची असते. शाहू फुले आंबेडकरांच्या विचारांना ताकद मिळायला हवी. या युती सरकारने या विचारांना गाडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला अपमानित करणे. या लोकांची मानसिकता पाहा. महिलांचा अपमान करणे ही भाजपाची मानसिकता आहे. ते अहिल्यानगरमध्ये दिसले. महाराष्ट्र वाचवणे, शेतकरी, तरुण आणि गरीबाला न्याय देणे, राज्यात कर वाढवले आहेत ते कमी करणे हा आमचा उद्देश आहे. त्यामुळे ही लढाई काँग्रेस लढतेय. ही वेळ महाराष्ट्राला वाचवण्याची आहे. एकत्रित येऊन मविआला निवडून द्यावं असं आवाहन नाना पटोलेंनी कार्यकर्त्यांना केले.

दरम्यान, सांगलीसारखा पॅटर्न कुठे होऊ नये असा आमचा प्रयत्न आहे. काही जागांचा वाद आहे तो उद्यापर्यंत संपेल. सगळ्या समाजाला संधी मिळावी यासाठी काँग्रेसचा प्रयत्न झालेला आहे. पक्ष संघटना असो वा सत्तेत सर्व समाजाला न्याय कसा देता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करतोय. महाराष्ट्राची संस्कृती भाजपाने खराब करण्याचं पाप केले आहे. मराठा विरुद्ध ओबीसी, धनगर विरुद्ध आदिवासी ही फूट निर्माण करून सामाजिक तेढ निर्माण केला आहे. जातीय जनगणना करून या सर्व प्रवाहांना मुख्य प्रवाहात कसं आणता येईल ही भूमिका आमची आहे असं नाना पटोलेंनी सांगितले आहे.

## माझी बायको हिरोईन नाही म्हणून तिकिट मिळालं नसावं; शरद पवार गटातील इच्छुकाची खंत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत शरद पवार गटाकडून मुंबईतील अणुशक्तीनगर मतदारसंघात उमेदवार देण्यात आला आहे. समाजवादी पक्षाचे नेते फहाद अहमद यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आणि त्यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केले. मात्र या उमेदवारीमुळे अणुशक्ती मतदारसंघातील इच्छुक नाराज झाले आहेत. अणुशक्तीनगरमधील कार्यकर्त्यांना पक्षाचा हा निर्णय आवडला नाही. आम्ही चर्चा करून भूमिका जाहीर करू असं विधान राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार गटाचे मुंबई कार्याध्यक्ष आणि प्रवक्ते निलेश भोसले यांनी म्हटलं आहे.

निलेश भोसले म्हणाले की, ज्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अतिशय अडीअडचणीच्या काळात होती तेव्हा आमच्यासारखे छोटे छोटे कार्यकर्ते खिशात दमडी नसतानाही शरद पवारांचे विचार टिकले पाहिजे. महाराष्ट्राशी अजिबात धोका होता कामा नये. निष्ठेने आम्ही काम केले. अजित पवारांसोबत ३०-४० आमदार गेले. मंत्री गेले तरीही आम्ही डगमगलो नाही. ज्यावेळी पक्षाला चांगले दिवस येतील तेव्हा आमच्यासारख्या निष्ठावंतांचा पक्ष नक्कीच विचार करेल अशी अपेक्षा होती. परंतु समाजवादी पक्षातील नेत्याने पक्षात प्रवेश केला आणि थेट त्याला निवडणुकीचं तिकिट जाहीर केले त्यामुळे हा निर्णय दुर्दैवी आहे. अणुशक्तीनगरमधील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना हा निर्णय नक्कीच आवडणार नाही असं त्यांनी सांगितले.



तर या मतदारसंघात २-३ इच्छुकांनी अर्ज केला होता. परंतु कदाचित आमच्यापैकी कुणाची बायको हिरोईन नसल्याने आम्हाला तिकिट मिळालं नसावं. आम्ही प्रमुख कार्यकर्ते हा पक्षाचा कणा आहे. जोपर्यंत कार्यकर्त्यांशी आम्ही बोलत नाही. त्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्याशिवाय आम्ही कुठलाही निर्णय घेणार नाही. कार्यकर्ते जे सांगतील त्याप्रकारे आम्ही निर्णय घेऊ. कार्यकर्त्यांच्या आदेशाचे पालन अणुशक्तीनगरमध्ये पुढच्या काळात होणार आहे. राष्ट्रवादी पक्षाचा मी प्रमुख कार्यकर्ता आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचा मान सन्मान कसा जपला जाईल. आपल्या भूमिकेमुळे नवाब मलिकांना फायदा होणार असेल तर कार्यकर्त्यांच्या मानसन्मानाला ठेच पोहचणार नाही याचीही दक्षता मला घ्यावी लागेल. त्यामुळे कार्यकर्त्यांची मते जाणून घ्यावी लागतील असं निलेश भोसले म्हणाले.

दरम्यान, ४ महिन्याआधी अणुशक्तीनगरमध्ये ज्या भाडोत्रीने घर घेतले, त्याला या परिसरातील कुठलेही प्रश्न माहिती नाहीत. ज्याप्रकारे १०-१५ वर्ष पूर्वीचे आमदार काम करत होते, त्यात जो फटका बसू शकतो. महायुतीचा उमेदवार जिंकू नये यासाठीही आम्ही प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी कार्यकर्त्यांशी बोलून आम्हाला निर्णय घ्यावा लागेल असं सांगत निलेश भोसले यांनी पक्षाने दिलेल्या उमेदवारावर नाराजी व्यक्त केली.

## संपादकीय ......

# दक्षिणेकडील राज्यांना घटत्या लोकसंख्येची चिंता

*देशात लोकसंख्या नियंत्रणाबाबत नेहमीच चर्चा होते; मात्र दक्षिण भारतातील राज्यांनी लोकसंख्या वाढवण्यावर भर देण्यास सुरुवात केली आहे. दक्षिणेकडील राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनीही आपल्या राज्यांतील लोकांना प्रत्येकी १६ मुले जन्माला घाला, असे सांगायला सुरुवात केली आहे. लोकसंख्या वाढवण्यामागचा हेतू स्पष्ट आहे. केंद्रीय सत्तेत अधिक सहभाग आणि आर्थिक मदतीची इच्छा दक्षिणेकडील राज्यांना तसे करण्यास भाग पाडत आहे.*

*लोकसभेसाठी नव्याने परिसीमन झाल्यास उत्तर भारतातील राज्यांतील जागांमध्ये मोठी वाढ होण्याची भीती दक्षिणेकडील राज्यांना आहे, तर दक्षिण भारतातील राज्ये यामध्ये मागे राहतील. लोकसंख्येच्या प्रमाणात दक्षिण भारतातील राज्ये उत्तर भारतापेक्षा खूप मागे आहेत. अशा स्थितीत उत्तर भारतात लोकसभेच्या अधिक जागा मिळण्याची खात्री आहे. त्यामुळे केंद्रात उत्तर भारताचे वर्चस्व कायम राहणार आहे. वित्त आयोग राज्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक मदतही प्रदान करतो. यामुळे दक्षिणेकडील राज्यांचे नेहमीच नुकसान झाले आहे. दक्षिणेकडील राज्ये नेहमी आरोप करतात की, देशाला जास्त महसूल देऊनही उत्तर भारतातील राज्यांच्या तुलनेत त्यांना कमी आर्थिक मदत मिळते. उत्तर भारतातील राज्यांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, मध्य प्रदेश आणि राजस्थान या हिंदी भाषिक राज्यांमध्ये लोकसंख्यावाढीचा दर खूप जास्त आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये लोकसंख्या घटली आहे. या राज्यांमध्ये प्रजनन दर झपाट्याने कमी होत आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांत प्रजनन दर जास्त आहे. त्यामुळेच या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी अधिक मुले निर्माण करण्यासाठी कायदे करण्याची चर्चा सुरू केली आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू म्हणाले की, त्यांचे सरकार राज्यातील रहिवाशांना अधिक मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी कायद्यावर काम करत आहे. ते म्हणाले की, आम्ही आधीच तोट्यात आहोत. दोनपेक्षा कमी मुले असण्यामुळे तरुणांची संख्या झपाट्याने कमी होत आहे.*

*तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी लोकसंख्यावाढीच्या कमी दरामुळे दक्षिण भारताचा संसदेच्या जागांमध्ये संभाव्य घट लक्षात घेता, १६ मुले जन्माला घालण्याचे लक्ष्य का ठेवले नाही, असा उपहासात्मक सवाल केला. यापूर्वी कर्नाटकनेही आपली व्यथा मांडली होती. वित्त आयोगाने दिलेल्या वाट्याबद्दल कर्नाटकने नाराजी व्यक्त केली आणि त्यासाठी लोकसंख्या धोरणाला जबाबदार धरले. कर्नाटकला १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत (२०१५-२०२०) ४.७१ टक्के कर वाटा मिळाला होता, जो १५ व्या वित्त आयोगाने (२०२०-२०२५) कमी करून ३.६४ टक्के केला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी 'एक्स'वर पोस्ट करून वाटा १.०७ टक्क्यांनी कमी झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, २०२० पूर्वीच दक्षिणेकडील राज्यांनी चिंता व्यक्त केली होती, जेव्हा १५ व्या वित्त आयोगाने केंद्र सरकारकडून राज्यांना कर हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यासाठी २०११ च्या जनगणनेचा वापर करून आपला अहवाल सादर केला होता. लोकसंख्या नियंत्रित करण्याची शिक्षा दक्षिणेकडील राज्यांना भोगावी लागत आहे, असे ते म्हणाले. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार केंद्रीय कर आणि शुल्काच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्यनिहाय वितरण दर्शविणारे विधान लोकसंख्येतील या भिन्नतेचा प्रभाव स्पष्टपणे दर्शवते. आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा आणि केरळ या पाचही दक्षिणेकडील राज्यांना पुढील आर्थिक वर्षासाठी विकेंद्रीकरणासाठी वाटप करण्यात आलेल्या एकूण रकमेपैकी १५.८ टक्के रक्कम मिळेल, तर बिहार आणि उत्तर प्रदेश या उत्तरेकडील राज्यांना सुमारे २८ टक्के रक्कम मिळेल. एक गोष्ट आणखी गुंतागुंतीची करते.*

*१५ व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालात हे मान्य केले आहे की, कमी दरडोई उत्पन्न असलेली बहुतांश राज्ये जास्त लोकसंख्येने भरलेली आहेत. त्यामुळे चांगली कामगिरी करणार्या अनेक दक्षिणेकडील राज्यांना दरडोई उत्पन्न कमी असलेल्या राज्यांपेक्षा कमी वाटा मिळेल. उत्तर आणि दक्षिण भारतातील या लढतीवर शैलजा चंद्रा म्हणाल्या की, आधी चंद्राबाबू आणि स्टॅलिन यांनी विविध प्रकारे घटत्या लोकसंख्येवर प्रश्न उपस्थित केले आहेत. दोघेही आपल्या नागरिकांना अधिक मुले होण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. संसदेतील राज्याच्या जागांवर सीमांकन कसा परिणाम करेल हीच त्यांची चिंता आहे. कारण, केवळ लोकसंख्या संसदीय प्रतिनिधित्व ठरवते. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश (अविभाजित) यांनी दशकापूर्वी कुटुंब नियोजनात गुंतवणूक केली होती. तामिळनाडूने नसबंदीला सर्वोच्च प्राधान्य दिले. आंध्र प्रदेशने लवकर प्रसूतीला प्रोत्साहन दिले आणि त्यानंतर त्वरित नसबंदी केली. याचा परिणाम असा झाला की, त्यांनी लोकसंख्या वाढ खूप आधी स्थिर केली, तर उत्तर प्रदेश आणि बिहार आणि अन्य उत्तरेकडील राज्यांनी लोकसंख्या नियोजनाकडे दुर्लक्ष केले. दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रजनन दरातील घसरण कमी करणे सोपे नाही. मुख्यमंत्र्यांनी कायदा केला, तरी चालेल. सध्याची परिस्थिती पाहता, हे स्पष्ट होते की, पुढील ४० वर्षांसाठी भारतातील कर्मचार्यांचे मुख्य पुरवठादार बिहार, उत्तर प्रदेश, झारखंडचे लोक असतील. दक्षिणेकडील राज्ये त्यांचा कमी प्रजनन दर घटवू शकत नाहीत. त्यांना सामोरे जाण्यासाठी एकच उपाय शिल्लक आहे, तो म्हणजे स्थलांतर. स्थलांतराला परवानगी दिल्याशिवाय कोणताही देश यशस्वी झालेला नाही. भारत हा दाट लोकवस्तीचा देश आहे. उत्तर भारतातील दाट लोकसंख्या स्थलांतर करून दक्षिणेच्या गरजा भागवू शकते.*

# वसुबारसेला बाजरीची भाकरी, गवारीच्या भाजीचा पारंपरिक नैवेद्य, काय आहे नेमके शास्त्र?

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**




दिवाळीचा पहिला दिवा म्हणजेच वसुबारस. यालाच गोवत्स द्वादशी म्हणूनही ओळखले जाते. पूर्वीच्या काळी घरातील स्त्रिया गायीला नैवेद्य दाखवल्याशिवाय स्वत: जेवत नसत. गाय देवासमान असल्याने तिची पूजा करण्याला कायमच विशेष महत्त्व असते. हल्ली आपण शहरामध्ये राहत असल्याने गायीची पूजा करणे होत नाही. मात्र गोमातेला वंदन करुनच सर्व चांगल्या गोष्टींची सुरुवात केली जाते

गायीला आपल्या संस्कृतीत देव मानलेले असल्याने गायीची पूजा करुन तिला नैवेद्य दाखवून मग आपण तो खाण्याची प्रथा आहे. त्यामुळे वसुबारसेमागे धार्मिक आणि आरोग्याच्यादृष्टीनेही विशेष महत्त्व आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्याकडे प्रत्येक सणाला केल्या जाणाऱ्या पदार्थांना अर्थ असन बदलते ऋतू, आरोग्य यादृष्टीने त्याचा विचार केला जातो. वसुबारसेलाही गायीला बाजरीची भाकरी आणि गवारीच्या भाजीचा नैवेद्य दाखवला जातो. नैवेद्य म्हणून हे पदार्थ करण्यामागे नेमके काय शास्त्र आहे हे समजून घेऊया..

## बाजरीचे महत्त्व

बाजरी हे एक तृणधान्य असून आहारात तृणधान्यांचा समावेश असणे अतिशय गरजेचे असते. थंडीच्या दिवसांत बाजरी आवर्जून खाल्ली जाते कारण ती उष्ण असते. थंडीपासून रक्षण होऊन आपल्या शरीरालाही चांगली उष्णता मिळावी म्हणून बाजरी खाण्याला विशेष महत्त्व आहे. गायीने जास्तीत जास्त दूध द्यावे म्हणून तिला बाजरी आणि गुळाचा आहार दिला जातो. ज्याप्रमाणे गायीला बाजरी-गुळातून पोषण मिळते त्याचप्रमाणे आपल्यालाही यातून चांगले पोषण मिळते. म्हणून थंडीच्या काळात आवर्जून बाजरीचे पदार्थ खाल्ले जातात. यामध्ये भाकरी, खिचडी, वडे यांचा समावेश होतो.

## गवारीतून मिळते भरपूर पोषण

गवार ही वातूळ भाजी म्हणून ओळखली जात असली तरी तिच्यात प्रोटीन, फायबर्स, कार्बोहायड्रेटस, व्हिटॅमिन्स हे सगळे मुबलक प्रमाणात असते. याशिवाय गवारीमध्ये फॉस्फरस, कॅल्शियम, लोह आणि पोटॅशियमही मोठ्या प्रमाणात आढळून येते.हाडांच्या मजबुतीसाठी, डायबिटीस, हृदयाचे आरोग्य, रक्तदाब, त्वचाविकार यांवर गवारीची भाजी वरदान मानली गेली आहे. हिवाळ्यात भाज्या मुबलक प्रमाणात मिळतात त्यामुळे सर्वच प्रकारच्या भाज्या भरपूर प्रमाणात खाल्ल्या जातात.




# दिवाळी वजन वाढू नये म्हणून 'हे' काम करा; तळलेले, गोड पदार्थ खाऊन कणभर वजन वाढणार नाही

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

दिवाळी म्हणलं की गोड आणि फराळाचे पदार्थ खाणं आलंच त्यामध्ये जास्तीत फराळाचे पदार्थ हे तळलेले असतात आणि हे सगळे पदार्थ मनसोक्त खाल्ल्याशिवाय समाधान सुद्धा मिळत नाही. फराळाचे पदार्थ अगदी दिवाळी संपल्यानंतरही वारंवार खाल्ले जातात. परंतु त्या पाठोपाठ येते ती ऍसिडिटी खूप सुस्ती आणि वाढलेले वजन.




सातत्याने व्यायाम आणि चांगला आहार घेणाऱ्यांच्या आयुष्यामध्ये हे प्रॉब्लेम्स खूप कमी येतात परंतु वर्षभर काहीच करायचं नाही आणि दिवाळीमध्ये सुद्धा वाटेल तसे खाण्यामुळे पचनाचे त्रास सुरू होऊ शकतात. ज्यामुळे फक्त पचनक्रियेवरच परिणाम होत नाही तर वजनातही बदल दिसून येतो. वजनात मोठ्या प्रमाणात वाढ होते. पोषणतज्ज्ञ आणि वेट लॉस मॅनेजमेंट अडव्हायजर मंजिरी कुलकर्णी यांनी दिवाळीत वजन वाढू नये यासाठी काही खास टिप्स सांगितल्या आहेत.

आता यावर उपाय काय तर. सगळ्यात आधी शरीराला हायड्रेटेड ठेवणं फार आवश्यक आहे म्हणजेच पाणी दिवाळीच्या काळामध्ये जास्त प्यायला हवं. किंवा लिक्विड पदार्थांचे सेवन जास्तीत जास्त करायला हवं यामध्ये तुम्ही ताक लिंबू पाणी हे जास्त प्रमाणात घेऊन स्वतःला हायड्रेटेड ठेवू शकता.

**फराळाच्या किंवा तेलकट पदार्थांवर नियंत्रण कसा मिळवायचं?-** यामध्ये तुम्हाला सगळ्यात सोपी गोष्ट म्हणजे पोर्शन कंट्रोल जर केलं तर तुम्हाला त्याचा खूप फायदा होऊ शकतो. जेव्हा तुम्ही फराळ ताटात वाढून घेता तेव्हा त्याचं प्रमाण लक्षात घेणं फार आवश्यक आहे. खूप पोटभर फराळाचं खायचं आणि त्यानंतर जेवण सुद्धा करायचं हे दोन्ही जर तुम्ही केलं तर तुम्हाला नक्कीच त्रास होऊ शकतो. त्याचबरोबर अजून एक टीप आहे ती म्हणजे आता मार्केटमध्ये आवळे मिळत आहेत तर तुम्ही दिवाळीच्या काळामध्ये रोज एक आवळा खाल्लात तर तुमची ऍसिडिटी नियंत्रणात राहण्यासाठी याची खूप मदत होऊ शकते. त्यामुळे भरपूर पाणी पिणे, ताक पिणे, लिंबू पाणी पिणे आणि दररोज एक आवळा खाणे हे जर केलेत तर तुम्हाला दिवाळीमध्ये त्रास होणार नाही.

# अधिक उत्पादनाची हवी असेल हमी; तर 'अशी' करा रब्बीत मका पिकाची पेरणी

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक** महाराष्ट्र राज्यात तृणधान्य वर्गातील महत्वाचे पीक म्हणजे मका पिक होय. तृणधान्य पिकांच्या उत्पादनामध्ये गहू आणि भात या पिकांनंतर मक्याचा जगात तिसरा क्रमांक लागतो. अन्नधान्य व्यतिरिक्त मक्याचा उपयोग प्रामुख्याने स्टार्च, अल्कोहोल, गोंद, रंग, कृत्रिम रबर इत्यादी विविध पदार्थ तयार करण्यासाठी होतो. त्यामुळे मका नेहमीच मागणीत असते. याच अनुषंगाने जाणून घेऊया रब्बी हंगामातील मका लागवडीचे अधिक उत्पादन देणारे तंत्र.

**१. हवामान व जमीन**

मका उष्ण, समशीतोष्ण आणि थंड अशा सर्व हवामानात येणारे पीक आहे. मक्यासाठी मध्यम ते भारी, खोल, उत्तम निचरा असणारी, भरपूर प्रमाणात सेंद्रिय पदार्थ असणारी व जलधारणाशक्ती अधिक असलेली जमीन चांगली असते.

**२. पूर्वमशागत**– जमिनीची खोल (१५ ते २० सें.मी.) नांगरट करावी. कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. हेक्टरी १० ते १२ टन शेणखत टाकावे. तर हिरवळीचे खत जमिनीत गाडले असल्यास शेणखताची आवश्यकता भासत नाही.

**३. पेरणी**– रब्बी हंगामात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत पेरणी करावी. रब्बी हंगामात मका पिकाची लागवड सरीवरंबा पद्धतीत करावी.

**४. पेरणीचे अंतर व बियाणे प्रमाण**– सरीवरंबा पद्धतीत मका पिकाची पेरणी टोकण पद्धतीने करावी.

उशिरा आणि मध्यम जातींसाठी ७५ सें.मी. २० सें.मी. अंतरावर टोकण करावी. तर लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६० सें.मी. २० सें.मी. अंतरावर टोकण करावी. यासोबतच बियाण्यांचे प्रमाण १५ ते २० किलो/ हेक्टरी ठेवावे.

५. मका पिकाचे काही प्रसिद्ध वाण, कालावधी, वैशिष्ट्ये, उत्पादन

मांजरी- ९०-११० दिवस संमिश्र वाण, उत्पन्न ४० ते ५० क्विंटल/हे. नारंगी, पिवळे दाणे.

राजर्षी- १००-११० दिवस संकरित वाण; उत्पन्न ५५ ते ६० क्विंटल/ हे.

डेक्कन १०५-१००-११० संकरित वाण; उत्पन्न ५५ ते ६० क्विंटल/हे.

करवीर- १००-११० दिवस संमिश्र वाण; उत्पन्न ४० ते ५० क्विंटल/ हे, ५० ते ५५ क्विंटल/हे नारंगी, पिवळे दाणे.

आफ्रिकन टॉल- संमिश्र वाण (चाऱ्यासाठी सर्वोत्तम); उत्पन्न ६० ते ७० हिरवा चारा/हे. आणि धान्य उत्पन्न ५० ते ५५ किलो/हे.

**६. बिजप्रक्रीया**– करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास लावावे. तसेच अॅझोटोबॅक्टर जीवाणू संवर्धन २५ ग्रॅम किंवा १०० मिली प्रति किलो बियाण्यास लावून नंतर पेरणी करावी.

**७. खत व्यवस्थापन**– रब्बी मका पिकाची जोमदार वाढ होण्यासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. पेरणीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र द्यावे. तसेच पेरणीनंतर ४५ दिवसांनी उर्वरित ४० किलो नत्र द्यावे.




कृषी विशेष

८. पाणी व्यवस्थापन

मका पिकाच्या महत्वाच्या अवस्थांच्या वेळी पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनात लक्षणीय घट येऊ शकते. त्यामुळे महत्वाच्या अवस्थांमध्ये पाणी देणे आवश्यक आहे. याकरिता पेरणीनंतर लगेच पाणी द्यावे. पेरणीनंतर २० ते ४० (पिकाची शाकीय अवस्था) दिवसांनी पाणी द्यावे. पेरणीनंतर ४० ते ६० (पिक फुलोऱ्यात असताना) दिवसांनी पाणी द्यावे. दाणे भरण्याच्या वेळी (७५-८० दिवसांनी) पाणी द्यावे. रब्बी हंगामात जमिनीच्या मगदुरानुसार १०-१२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

**९. आंतरमशागत**– पेरणी संपताच चांगल्या वाफशावर तण नियंत्रणासाठी अँट्रटॉप ५० टक्के प्रवाही २ ते २.५ किलो प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून सम प्रमाणात जमिनीवर फवारावे. तणनाशक फवारणीनंतर १५ ते २० दिवसांपर्यंत आंतरमशागत करू नये.

**१०. पिक संरक्षण**

**अ. किड नियंत्रण**

१. खोडकिडा नियंत्रण : ईमीडाक्लोप्रीड १ मिली/लिटर पाण्यातून फवारावे किंवा कार्बारीलची भुकटी ८५%/ १७०० ग्रॅम/हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून फवारावे.

२. मछली अळी : मिथिल पॅराथीऑनची भुकटी २० ते ३० किलो/हेक्टरी धुरळावी.

३. मावा व तुडतुडे : डायमिथोएट १ मिली/लिटर पाण्यातून फवारावे.

४. हिरवे कणसे पोखणाऱ्या अळ्या : मिथिल पॅराथीऑनची भुकटी २० ते ३० किलो/हेक्टरी धुरळावी.

**ब. रोग नियंत्रण**

१. खोड कुजव्या रोगाची लक्षणे दिसून येताच ७५% कॅप्टन १२ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्याच्या प्रमाणात जमिनीतून दिल्यास पिधीयम खोडकुजव्या रोगाचे नियंत्रण करणे शक्य होते.

२. करपा रोगाची लक्षणे दिसून येताच आवश्यकतेनुसार डायथेन एम-४५ किंवा मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात फवारावे.

**११. काढणी, मळणी व साठवणूक**

धान्यासाठी मका पिकाची काढणी कणसावरील आवरण पिवळसर पांढरे आणि दाणे टणक झाल्यावर करावी. प्रथम कणसे सोलून खुडून घ्यावीत आणि सोललेली कणसे दोन तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर मका सोलणी यंत्राने कणसातील दाणे काढावेत. सोलणी यंत्राने दाणे काढल्यानंतर मका दाण्यात ओलाव्याचे प्रमाण १०-१२ टक्के इतके होईपर्यंत उन्हात चांगले वाळवावे म्हणजे साठवणुकीत किडीमुळे नुकसान होत नाही.

**१२. उत्पादन**

संकरित वाण १०० ते ११० क्विंटल / हेक्टरी

संमिश्र वाण ४० ते ५० क्विंटल / हेक्टरी

चारा पिके ६० ते ७० टन हिरवा चारा / हेक्टरी

**प्रा. डॉ. गणेश बहुरे**
प्राचार्य, कृषि महाविद्यालय, खंडाळा ता. वैजापूर जि. छ. संभाजीनगर.

# सामाजिक एकतेचा धागा: विविधता हीच आपली शक्ती- विक्रमजितजी कलाने

## अभाविप अमरावती विभागाच्या सामाजिक एकता यात्रेचा समारोप संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अमरावती विभागाच्या वतीने आयोजित सामाजिक एकता यात्रेचा समारोप आज संत गाडगेबाबा समाधी मंदिर, गाडगेनगर, अमरावती येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. १८ ऑक्टोबर रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधी स्थळावरून सुरू झालेल्या या यात्रेने विभागातील विविध ठिकाणांवर प्रवास करत सामाजिक एकतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला.

समारोप कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रांत संघटन मंत्री श्री. विक्रमजीत कलाने, प्रांत सहमंत्री संदेश उरकुडे, आर्या पाचखेडे, अमरावती विभाग संयोजक अनुराग बालेकर, महानगर मंत्री रिद्धेश देशमुख, अनिकेत पजई उपस्थित होते. या कार्यक्रमात वक्त्यांनी सामाजिक एकतेचे महत्व आणि संतांची शिकवण समाजात दृढ करण्याचे आवाहन केले.

सामाजिक एकतेचा संदेश देणारी ही यात्रा जवळजवळ १०५१ किलोमीटर अंतर कापून ७० हून अधिक गावांतील ३५,००० ते ४०,००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. यात ७५ महाविद्यालये, १५ जूनियर कॉलेज, २५ वस्तीगृह यांचा सहभाग होता. यात वरील कार्यकर्त्यांसोबत अंकुशजी कुंघाटकर, ओम धाके, ओम धोटे, वृषभ गोहने यात्रेत पूर्णवेळ उपस्थित होते. यात्रेदरम्यान विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्याद्वारे समाजातील विविधता आणि एकात्मतेची महती अधोरेखित करण्यात आली.



अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अमरावती विभागाने यावेळी सर्व कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिकांचे आभार मानले आणि यापुढेही सामाजिक एकतेसाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.


RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर



# मविआत अजून गोंधळात गोंधळ

## २३ मतदारसंघांत उमेदवारच नाही; अर्ज भरायला एकच दिवस शिल्लक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ मुंबई**
: लोकसभा निवडणुकीत अधिकृत जागा वाटप जाहीर करणाऱ्या महाविकास आघाडीला विधानसभेत मात्र जागा वाटपाचा गोंधळ अजून निस्तरता आलेला नाही. तीनही पक्षांचे राज्यातील दिग्गज नेते, दिल्लीतील काँग्रेसचे नेते जागा वाटपाचा तिढा सोडवण्यासाठी बेठकांवर बैठका घेत आहेत. तिढा काही सुटलेला नाही.

उमेदवारी अर्ज भरायला केवळ दोन दिवस शिल्लक असताना मविआचे २३ मतदारसंघातील उमेदवार जाहीर व्हायचे बाकी आहेत. काही जागांवर मित्र पक्षांत तिढा आहे. काही जागांवर एकापेक्षा जास्त उमेदवार इच्छुक असल्याने ते पक्ष उमेदवार निश्चित करू शकले नाहीत. काँग्रेस व शरद पवार गटातील तिढा सोडवण्यासाठी रविवारी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवारांची भेट घेतली.



### मतदार दूर जाण्याची भीती...

मविआतील जागा वाटपाच्या गोंधळामुळे तीनही पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच इतर नेते संभ्रमात आहेत. याशिवाय लोकसभा निवडणुकीत मविआला मतदान करणारा मतदारही या गोंधळामुळे आमच्यापासून दूर जाईल, अशी भीती मविआतील एका नेत्याने बोलताना व्यक्त केली

### दोन जागांवर दोन पक्षांचे उमेदवार

- मविआकडून आतापर्यंत जागा वाटपाचे दोन वेगवेगळे फॉर्म्युले जाहीर करण्यात आले आहेत. पहिला ८५-८५-८५ जागांचा फॉर्म्युला तीनही पक्षांच्या नेत्यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी जाहीर केला.

- दुसरा ९०-९०-९० चा फॉर्म्युला काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी जाहीर केला. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार मविआत काही जागांवर अजूनही वाद सुरू आहे. त्याबाबत मविआतील नेते काहीच बोलायला तयार नाहीत.

- दुसरीकडे अशाच वादाच्या दोन जागांवर मविआच्या दोन पक्षांनी आपले उमेदवारही जाहीर केले आहेत. यात दिग्रस मतदारसंघातून काँग्रेसचे माणिकराव ठाकरे तर उद्धव सेनेचे पवन जयस्वाल आणि परांडा मतदारसंघात शरद पवार गटाचे राहुल मोटे आणि ठाकरे गटाचे राहुल पाटील यांचा समावेश आहे.आहे.

### कोणते मतदारसंघ अजून कोरडे?

१. सिंदखेडा, २. शिरपूर, ३. अकोला पश्चिम, ४. दर्यापूर, ५. वरूड-मोर्शी, ६. पुसद, ७. पैठण, ८. बोरिवली, ९. मुलुंड, १०. मलबार हिल, ११. कुलाबा, १२. खेड आळंदी, १३. दौंड, १४. मावळ, १५. कोथरूड, १६. औसा, १७. उमरगा, १८. माढा, १९. वाई, २०. माण, २१. सातारा, २२. मिरज, २३. खानापूर

मित्र पक्षाला सोडलेले मतदारसंघ

१. भिवंडी पूर्व - सपा, २. मानखुर्द शिवाजीनगर - सपा, ३. पेण - शेकाप, ४. अलिबाग - शेकाप, ५. श्रीवर्धन - शेकाप, ६. कळवण- माकप, ७. डहाणू - माकप.

# दुसरा बौध्द बांधव मोठा होऊ नये म्हणून खा.बळवंत वानखडेंनी माझे तिकीट कापले - गुणवंत देवपारे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-** दर्यापूर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव असल्याने पक्षाच्यावतीने सर्वे केला त्यावेळी उमेदवार म्हणून आघाडीवर माझेच नाव होते. मात्र काँग्रेस महाविकास आघाडीचे विद्यमान खासदार बळवंत वानखडे यांच्या हेकेखोर धोरणामुळे व त्यांनी काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांच्यावर प्रभाव टाकून काँग्रेस महाआघाडीच्या उमेदवारीपासून मला वंचित ठेवले.उमेदवारी मिळत असताना दुसरा बौद्ध माणूस मोठा होऊ नये म्हणून खासदार बळवंत वानखडे यांनी उमेदवारी मिळू दिली नाही. मला उमेदवारी न मिळण्याला तेच जबाबदार असल्याचा आरोप गुणवंत देवपारे यांनी आदर्श हॉटेल येथे रविवारी (ता. २७) पत्रपरिषदेतून केला आहे. दर्यापूर मतदारसंघासह आणखी एका मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवून काँग्रेसशी बंडखोरी करणार असल्याचा इशारा गुणवंत देवपारे यांनी पत्रपरिषदेतून दिला आहे.



आपण दर्यापूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढणार असल्याचेही त्यांनी पत्रपरिषदेत स्पष्ट केले आहे. तसेच आणखी एका मतदारसंघातून निवडणूक लढणार असून तो मतदार संघ कोणता याबाबत सोमवारीगौप्यस्फोट करणार आहे. खासदार बळवंत वानखडे यांच्याविषयी तीव्र नाराजी व्यक्त करून सोमवारी (ता.२८) दर्यापूर मतदारसंघातून गुणवंत देवपारे अपक्ष उमेदवार म्हणून नामांकन अर्ज दाखल करणार आहेत.

वरिष्ठ नेत्यांनी दर्यापूर मतदारसंघाची उमेदवारी उबाठाला दिली, यात मला काहीच अडचण नाही. मात्र ही उमेदवारी शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अभिजीतअडसूळ यांना निवडून आणण्यासाठी उबाठाचा उमेदवार दिला काय ही चिंतनीय बाब असल्याचे यावेळी गुणवंत देवपारे म्हणाले. काँग्रेस कडे बारा ते तेरा लोक उमेदवारीसाठी इच्छुक होते. त्यापैकी कुठल्याही एका इच्छुक उमेदवाराला काँग्रेस महाविकास आघाडीची उमेदवारी मिळाली असती तर मी त्यांच्यासोबत राहिलो असतो, असे यावेळी देवपारे यांनी सांगितले.दर्यापूर मतदारसंघ हा काँग्रेसला सुटेल हे अखेरच्या क्षणापर्यंत माहीत होतं तरीसुद्धा काँग्रेसने भ्रमनिराश केला आहे. एकाच जातीपुरता विचार न करता सर्व धर्म समभाव जोपासून अनूसूचित जातीमधून मतदार संघाच्या विकासासाठी काँग्रेसला उमेदवारी मागितली होती.मात्र ती मिळाली नाही. त्यामुळेच विविध सामाजिक संघटना, काही पक्षांचे राजकीय कार्यकर्ते, पदाधिकारी आणि आपल्या व्यापक जनसंपर्काच्या जोरावर दोन विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवणार आहे. संपूर्ण ताकदनिशी समाजकार्यासाठी उमेदवारी दाखल करून घटक पक्षांना एकत्र घेऊन मी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे गुणवंत देवपारे यांनी सांगितले.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मध्ये सुसंस्कृत , कर्त्यव्याची जाणीव असणारा व देशसेवा करणारा अभियांत्रिकी घडेल - प्रविण पोटे पाटील

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक सभा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे नुकताच पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष मा आ. प्रविण पोटे पाटील , उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील, संचालक डॉ. पी. एम. खोडके. प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य मो. झुहेर, पालक प्रतिनिधी सौ नयना तिवारी, डॉ. व्ही. एन. घाटे, महाविद्यालयाचे डीन, सर्व विभाग प्रमुख व मान्यवरांच्या हस्ते श्री संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण करून पालक सभेला सुरवात करण्यात आली.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रगती साठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात यामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळते तसेच अभ्यासक्रमासोबत महाविद्यालयात असणारे विद्यार्थ्यांच्या विविध क्लब च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणारा प्रत्यक्ष विद्यार्थी हा सुसंस्कृत , कर्त्यव्याची जाणीव असणारा अभियांत्रिकी तसेच आयएएस, आयपीएस , सायंटिस्ट बनून देशाची सेवा करणारा घडेल यात शंका नाही. असे मत संवाद साधताना आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केले पुढे ते म्हणाले महाविद्यालयाचे देश विदेशातील नामांकित बहुराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्यांसोबत करार झाले आहे. इंडस्ट्रीच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करण्याची व राबविण्याची मुभा महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्याने मिळाली असून यापुढे महाविद्यालयात शिकणारा प्रत्येक विद्यार्थ्यांना रिसर्च सेंटर व इंडस्ट्रीतील आधुनिक प्रोजेक्ट वर काम करण्याचे स्वातंत्र्य दिल्या जाईल त्यामुळे विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञान शिकण्यास व कौशल्य वृद्धिगत होण्यास चालना मिळेल विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला , सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल. तसेच महाविद्यालयात शिकणारा प्रत्येक विद्यार्थी हा इंडस्ट्रीच्या मागणीनुसारच घडविल्या जाईल त्यामुळे येणाऱ्या काळात बहुराष्ट्रीय कंपण्यामंध्ये प्लेसमेंट होण्यास सोपे जाईल असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी पालकांसोबत संवाद साधताना व्यक्त केले.

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाने अभियांत्रिकी ,विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भरारी घेणारे अनेक विद्यार्थी घडवले आहेत आजच्या आधुनिक जगात वावरताना शिक्षक पालक व विद्यार्थ्यांची सांगड हि फार महत्वाची आहे शिक्षक ज्या परिश्रमाने विद्यार्थ्यांना घडवितो त्याचप्रकारे पालकांनी सुद्धा पाल्याच्या महत्वकांक्षा ओळखून शिक्षकांसोबत त्याच्या शैक्षणिक प्रगतीत सारथी होणे आवश्यक आहे असे मत यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ पी. एम. खोडके यांनी व्यक्त केले




तर उच्च शिक्षणाच्या जागतिकरणाच्या स्पर्धेत स्वायत्त महाविद्यालये एक महत्वाचे पाऊल आहे.स्वायत्त महाविद्यालयाचे मुख्य उद्दिष्ट हे विद्यार्थांचा सांगोपांग शैक्षणिक विकास उज्वल करणे हा असून विद्यार्थ्यांना जागतिकरणाच्या स्पर्धे करीता सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्या जाईल असे मत पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया संवाद साधत मत व्यक्त केले.

त्याचप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डीन डॉ. दीपक शाहाकार यांनी एनईपी शिक्षण प्रणाली बद्दल पालकांना महत्व पटवून दिले.

यानंतर पालक प्रतिनिधी सौ नयना तिवारी तसेच डॉ व्ही. एन. घाटे यांनी संस्थेमध्ये असलेली शिस्त , महाविद्यालयातील प्रफुल्लीत वातावरण, शिक्षणासोबत अध्यात्मिक जोड तसेच शिक्षकांच्या वतीने वापरण्यात येणारी आधुनिक शिक्षणाची पद्दत व महाविद्यालयातून दिले जाणारे प्लेसमेंट, फॉरेन टूर , डोमेस्टिक टूर याबद्दल प्रशंसा करत आपले मत व्यक्त केले .

कार्यक्रमाच्या सरते शेवटी अविष्कार स्पर्धा कॉडेथोन स्पर्धा मध्ये जिंकणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला या सभेला अभियांत्रिकी एमबीए,एमसीए प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा जवळपास सर्वच पालकांनी उपस्थिती दर्शवली होती.

# तापडिया मॉल येथील हॉटेल एजन्ट जॅकमधील हुक्का पार्लवर धाड

## चार जण ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-**
स्थानिक तापडीया मॉलमधील हॉटेल एजन्ट जॅकमध्ये राजापेठ पोलिसांनी धाड टाकून हुक्कापार्लर चालविणाऱ्यासह चौघांना अटक करून ७ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गिरीश लालचंद बत्रा (वय ३७ रा. फरशी स्टॉप), अवेज शमीउल्ला खान (वय ४२, रा. विद्या कॉलनी), यश ज्ञानेश्वर वाघमारे (वय २१ रा. साईनगर) आणि योगेश विश्वनाथ रामेकर (वय २२ रा. साई नगर) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत.

नेहमीच कुठल्या ना कुठल्या अवैध धंद्यावरून तपडीया मॉल येथील हॉटेल एजन्ट जॅक चर्चेत असते याआधी एजन्ट जॅकमध्ये खुलेआम पब सुरु होता. त्यावेळी शहरातील काही सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांनी आंदोलन केले. पबमध्ये खुलेआम दारू विक्री केली जाते आणि अल्पवयीन मुले - मुर्ती दारुच्या नशेत बिनधास्त डान्स करतात. तसेच मुलांकडून प्रवेश शुल्क आकारण्यात येतो तर मुलींना मोफतहॉटेलमध्ये प्रवेश




दिला जातो. असा आरोप काही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला होता. त्यामुळे पोलीस आयुक्तांनी शहरातील अशा प्रकारचे सर्व हॉटेल बंद करण्याचे आदेश दिले होते. परंतु काही महिन्यानंतर हॉटेल एजन्ट जॅक दुसऱ्याचे नाव समोर करून सुरु करण्यात आले.पपंतु पड्याामागे ते चेहरे असून पुन्हा पब सारखी सर्वीस एजन्ट जॅकमध्ये ग्राहकांना दिली जाते. परंतु अद्यापही कुठलीच कारवाई नाही. शनिवारी रात्री राजापेठ पोलिसांना एजन्ट जॅकमध्ये खुलेआम हुक्का पार्लर सुरु असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड टाकून वेगवेगळ्या फ्लेवरचा हुक्क जप्त करून चौघांना अटक केली. या कारवाईमध्ये ठाणेदार पुनित कुलट यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक माणुसमारे, पोलीस कर्मचारी विजय घरवाल, विनोद माहुरे, जिवन बोंडे आणि संजय कडू यांचा समावेश होता.

### जागा उपलब्ध करून देणाऱ्यावर होणार कारवाई

हॉटेल एजन्ट जॅकमध्ये शनिवारी रात्री हुक्का पार्लर चालविणाऱ्यांवर कारवाई करून चौघांना अटक केली. तसेच हुक्का पार्लर चालविण्याकरिता जागा उपलब्ध करून देणाऱ्या हॉटेल मालकाविरुध्दसुध्दा कारवाई करण्यात येणार आहे.

- पुनित कुलट, ठाणेदार-

# कुंपणात वीज प्रवाह सोडल्यास होणार गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-** वन्य प्राण्यांपासून होणारी पिकाची नासाडी रोखण्यासाठी काही शेतकरी कुंपणात वीज प्रवाह सोडत असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले आहे. परंतु त्यामुळे वन्य प्राण्यांबरोबरच शेतात कामांसाठी गेलेल्या आणि अनावधानाने कुंपणास स्पर्श करणाऱ्या शेतकऱ्यांचा मृत्यू ओढवत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याची महावितरणने गंभीर दखल घेतली असून यापुढे कुंपणात अनधिकृत वीज प्रवाह सोडलेला आढळल्यास संबंधितावर विद्युत कायद्याच्या विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. गत काही महिन्यांपासून विजेचाशॉक लागून शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार घडत आहे. याची अधिक खोलात जाऊन चौकशी केली असता महावितरणच्या असे लक्षात आले की, शेतकरी पिकाच्या संरक्षणासाठी आकोडे टाकून थेट वीज तारांवरून वीज प्रवाह कुंपणात सोडतात. त्यामुळे अनावधानाने संपर्कात आलेल्या प्राण्यांसोबत शेतकऱ्यांचेही मृत्यू होत असल्याचे उघडकीस आले आहे. एकंदरीत हा प्रकार वाटतो तितका साधा नसून वीजचोरी बरोबरच सदोष मनुष्यवध यांसारख्या गंभीर गुन्ह्यांशी संबंधित आहे. तसेच जीवितहानी झाल्यानंतर त्याचा दोष विनाकारण महावितरणकडे देण्याचा आणि महावितरणकडून भरपाई मागण्याचा कल दिसून येत आहे.



# विविध करणे देत विधानसभा निवडणुकीच्या कामातून सुटका करण्याची कर्मचाऱ्यांची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारींची लगबग सुरू असतांना निवडणुकीची कामे रद्द करण्यासाठी कर्मचारी जिल्हा मुख्यालयाच्या फेऱ्या मारत आहे. परंतु नियुक्ती रद्दबाबत निवडणूक आयोगाचे स्पष्ट धोरण असल्याचे सांगत अधिकाऱ्यांकडून अर्ज नाकारण्यात येत आहेत.

जिल्ह्यात विधानसभेच्या आठ मतदारसंघात रणधुमाळीला प्रारंभ झाला आहे. या सर्व ठिकाणी २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकीच्या कामासाठी जिल्ह्यात साधारणतः १२ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे. त्यामध्ये महसूल, महापालिका, जिल्हा परिषद यासह शासनाच्या विविध विभागांकडील कर्मचारी नियुक्त केले आहेत. याशिवाय शिक्षकांनाही निवडणुकीची कामे देण्यात आली आहे. निवडणुकीसाठी नेमणूक केलेले



काही कर्मचारी दररोज जिल्हा निवडणूक शाखेत येत आहेत. याचवेळी निवडणुकीच्या कामातून सुटका करुनघेण्यासाठी विविध कारणे पुढे केली जात आहेत. त्यामध्ये दिवाळी सुट्यांसाठी कुटूंबातील व्यक्तीगत अडचणींचे कारण हमखास पुढे केले जात आहे. याशिवाय ड्युटी रद्द करण्यासाठी वैयक्तीक व कुटूंबातील व्यक्तींचे आजारपण तसेच अन्य कारणेही दिली जात आहे. मात्र। निवडणूक शाखेच्या अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांचे अर्ज तपासण्यात येत आहेत. त्यामध्ये आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करतांना परिस्थिती पाहूनच नियुक्ती रद्दबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे अपवाद वगळता अन्य कर्मचाऱ्यांना आल्या पावली परत जाण्याची वेळ येत आहे.

# ३२ पेक्षा अधिक उमेदवार राहिल्यास जिल्ह्याबाहेरील ईव्हीएम मशीन लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** - निवडणुक विभागाकडे सद्या ३ हजार ४०६ कंट्रोल युनिट, ६ हजार ८८ बॅलेट आणि ३ हजार ६७४ व्हिव्हिपॅड तयार आहेत. एका मतदान केंद्रावर किमान दोन इव्हिएम राहतील एवढ्या मशीन जिल्ह्यात पुरेशा आहेत. परंतु यापेक्षा एका विधानसभा मतदार संघात ३२ हुन अधिक उमेदवार वाढल्यास निवडणुक विभागाला इतर जिल्ह्यातुन इव्हिएमची आयत करावी लागणार आहे. जिल्ह्यात आठ विधानसभा मतदार संघाकरीता

२० नोव्हेंबरला मतदान होवु घातले आहे. निवडणुक विभागाकडुन जवळपास सर्वच तयारी पुर्ण झाली आहे. मतदानाकरीता आवश्यक असलेल्या ईव्हिएमची पहीली स्तर तपासणी पुर्ण करून सरमिसळची देखील प्रक्रिया पुर्ण केली आहे. त्यामुळे आता निवडणुक विभागाकडे लोकशाही भवन येथे ३४०६ कंट्रोल युनिट, ६०८८ बॅलेट आणि ३६७४ व्हिव्हिपॅड तयार आहेत. दोन दिवसांत या सर्व मशीन विधानसभा निहाय वितरीत केल्या जाणार आहे. एका बॅलेट युनिटवर नोटासह १६ उमेदवार ॲड केले जातात. त्यामुळे एका मतदान केद्रांवर दोन बॅलेट युनिट म्हणजेच ३२ उमेदवार असल्यास त्यांचे नाव ॲड करण्याकरीता पुरेशा मशीन उपलब्ध आहेत. आठही विधानसभा मतदार संघाचा विचार केल्यास २५६ उमेदवार एकाचवेळी निवडणुक लढतील तेवढ्या मशीन उपलब्ध असुन या व्यतिरिक्त ८५६ ईव्हिएम राखीव आहेत. त्यांची पहीली स्तर तपाणी केल्यास त्या देखील तयार होतील. परंतु एका विधानसभेत ३२ पेक्षा अधिक उमेदवार निवडणुक रिंगणात उतरल्यास निवडणुक विभागाला मात्र इतर जिल्ह्यातुन इव्हिएमची आयात करावी लागणार आहे.













**बच्चू कडूना आईचा आशीर्वाद !!**

निवडणूक नामांकन प्रत्येक वेळेस आईचा आशिर्वाद घेऊन दाखल करायचो. यावेळी आई सोबत नाही परंतु आई बाबाने दिलेली शिकवण सदैव ध्यानी मनी आहे. याच शिकवणीतुन मी व लाखो प्रहार कार्यकर्ते घडले व घडत आहे. अचलपुर चांदुरबाजार मतदारसंघ माझ्या पाठिशी खंबीरपणे सदैव उभा राहणार यात तिळमात्र शंका नाही.आज बच्चू कडू यांनी आपला उमेदवारी अर्ज अचलपूर मधून दाखल केला.

## अनिल देशमुखांनी लेकास उतरवलं मैदानात, सलील देशमुखांनी भरला अर्ज, तरीही म्हणाले, मी मंत्री होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ काटोल ८**

राज्याचे माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी यंदाच्या निवडणुकीतून माघार घेतल्याचं पाहायला मिळालं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अनिल देशमुख यांना काटोल मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, अनिल देशमुख यांनी आपण उमेदवारी अर्ज भरणार नसून यंदा मुलगा सलीलला उमेदवारी मिळावी, यासाठी पक्षनेतृत्वाकडे विनंती करणार असल्याचे म्हटले होते. त्यानुसार, विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्यादिवशी सलील देशमुख यांनी उमेदवारी अर्ज भरल्याचं दिसून आलं. भाजपा सरकार तीन वर्षापासून माझ्या मागे लागलंय, तरी त्यांच्या बापाला मी घाबरत नाही, असे म्हणत माजी मंत्री अनिल देशमुख यांनी विधानसभा निवडणुकांसाठी यंदा मुलगा सलीलला मैदानात उतरवत असल्याची माहिती आहे. मी काटोलमधून उमेदवारी फॉर्म भरला नाही, कारण त्यांनी (सत्ताधारी) नियोजन केलं होतं की अनिल देशमुख यांनी फॉर्म भरला, तर काही तरी तांत्रिक अडचणी काढायची आणि तो फॉर्म रद्द करायचा. त्यासाठी दिल्लीतून मोठे वकील आणून ठेवले आहेत, जे रश्मी बर्वेसोबत झालं, तसंच माझ्यासोबत करण्याचा डाव होता, असा गंभीर आरोपच



अनिल देशमुख यांनी केला आहे.

मी यंदा निवडणुकीसाठी पुन्हा उभा राहिलो असतो तर पूर्ण नवीन केसेस लावल्या असत्या. त्यामुळे मी उभं न राहता सलीलला उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सांगितले. सलीलने मला आग्रह करत उभे राहण्यास म्हंटले होते. मात्र, मी त्याला समजावून सांगितले आणि तो तयार झाला. मी जरी उभा नसलो, तरी भविष्यात सरकार माहाविकास आघाडीचंच येणार आहे. त्यानंतर शरद पवार साहेब मला पहिल्यांदा विधान परिषदेचा आमदार बनवतील, असा विश्वास अनिल देशमुख यांनी व्यक्त केला, तसेच ते मला मंत्रिमंडळातही घेतील, मात्र त्यासाठी सलील ला विजयी करावे लागेल, असेही त्यांनी म्हटले.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीला पक्षाच्या श्रेष्ठींनी मला संधी दिली. कोविड काळामध्ये मी सातत्याने घरी न बसता मतदारसंघात काम केले. अनिल देशमुख मंत्री असताना मी मतदार संघातील काम सांभाळत होतो. अनिल बाबूंना तुरुंगात टाकल्यानंतर मतदार संघातील नागपूर ते मुंबई पाठपुरावा करत होतो. पुढील काळात तुमचा प्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांचे, गरीबाचे, तरुणांचे, महिलांचे मुद्दे विधिमंडळात उचलणार असा विश्वास देतो, असे म्हणत सलील देशमुख यांनी काटोलकरांना भावनिक साद घातलीय. अनिल देशमुख यांना मी आश्वस्त केलंय, तुम्ही विदर्भात फिरून प्रचार करा, काटोलची जनता समजुतदार आहे, एकदा भूल केली होती. पण, आता तशी भूल काटोलची जनता करणार नाही, असेही सलील देशमुख यांनी म्हटले.

## निवडणुकीसाठी १०१ सरकारी वाहने जमा

### अधिकाऱ्यांची ११ वाहने ही निवडुन कर्तव्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांची सरकारी वाहने जमा करून घेण्यास सुरुवात झाली आहे. आजवर १०१ वाहने जमा करण्यात आली असून ती निवडणुकीसाठी वापरण्यात येत आहेत. यामध्ये ११ वाहने ही अधिकाऱ्यांची आहेत. ही सर्व वाहने निवडणुकीच्या कामासाठी वितरित करण्यात आली आहे.विधानसभा निवडणुकीसाठी वाहनांची आवश्यकता असते. आतापर्यंत केवळ १०१ वाहने जमा झाली आहेत. शंभरावर विभागांनानिवडणूक विभागाकडून नोटीस पाठविण्यात आल्या आहेत. यामध्ये अमरावती शहरातील विविध शासकीय कार्यालयांचा समावेश आहे. वाहन जमा मोहीम सुरूकरण्यात आल्याची माहिती



निवडणूक विभागाने दिली. निवडणुकीदरम्यान होणाऱ्या प्रचार सभांवर लक्ष ठेवण्यासाठी तसेच इतर कामासाठी निवडणूक विभागालावाहनांची आवश्यकता आहे. यात शासकीय अधिकाऱ्यांची विभागांची जिप, बस, ट्रक, ॲम्बुलन्स तर अग्निशमनच्या वाहनांचा समावेश आहे. तसेच यात काही वाहने कंत्राटी घेण्यात येणार आहे. १२० च्या जवळपास वाहने ही शासकीय विभागांकडून घेण्यात येणार आहेत. त्यासाठी विभाग प्रमुखांना पत्र पाठवण्यात आले. आतापर्यंत १०१ वाहने प्रशासनाकडे जमा झाली आहेत. विभागाकडून वाहन देण्यास टाळाटाळ केल्यास निवडणूक प्रशासनाकडून विभागांना नोटिस पाठवणारअसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. ही जमा झालेली वाहने निवडणुकीच्या कामासाठी वितरित केली आहे. अधिकाऱ्यांसह मतदार संघासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वाहने पाठवली आहेत तसेच नोडल अधिकारी स्वीप कक्ष १, नोडल अधिकारी खर्च नियंत्रण १, नोडल अधिकारी वाहन व्यवस्था १, लायझेरिंग अधिकारी ४ तसेच पदाधिकाऱ्यांची ११ वाहनेदेखील वितरित केली आहे. एका वाहनावर वाहन चालक नसून उर्वरित ८ वाहनांचा वापर करण्यात येत आहे. निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर पदाधिकाऱ्यांना वाहने परत मिळणार आहेत.

## पं.स.च्या कृषी अधिकाऱ्यासह सचिवावर गुन्हा दाखल

### कर्तव्यावर विनापरवानगीने गैरहजर असल्याचा ठपका

### नायब तहसीलदारांनी दिली तक्रार, कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** निवडणूक निरीक्षक (खर्च) यांचा २४ ऑक्टोबरला दर्यापूर विधानसभा मतदार संघामध्ये नियोजीत दौरा होता. दौऱ्यावेळी अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे कृषी अधिकारी अश्वीन राठोड व अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे सचिव भरत निस्ताने हे नियुक्तीच्या ठिकाणी विनापरवानगीने गैरहजर असल्याचे आढळून आले. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार

अंजनगाव सुर्जी यांच्या २४ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रान्वये नायब तहसिलदार (महसूल) अंजनगाव सुर्जी यांनी लेखी फिर्याद दिल्यामुळे – लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ – चे १३४ (१) अन्वये अंजनगाव सुर्जी – पंचायत समितीचे कृषी अधिकारी अश्वीन राठोड यांचेबर अंजनगाव पोलीस स्टेशन येथे व अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे सचिव भरत निस्ताने यांचेवर दर्यापूर पोलीस स्टेशन येथे २६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दर्यापूर विधानसभा मतदार संघामध्ये आदर्श आचार संहितेचे तंतोतंत पालन होण्याच्या दृष्टीने स्थिर निगराणी पथक व फिरते भरारी पथक गठीत करण्यात आलेले आहे. स्थिरनिगराणी पथक क्र.१/२ कारला चेकपोस्ट येथे अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे कृषी अधिकारी अश्वीन राठोड व अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे सचिव भरत निस्ताने यांची फिरते भरारी पथक क्रमाक ४ मध्ये संपूर्ण अंजनगाव तालुक्यामध्ये नियुक्ती करण्यात आलेली होती.

## दिवाळी निमित्त रघुवीर खास सुवर्ण भोग मिठाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** हिस्सा हर खुशियों का या विश्वासाने रघुवीर मिठाई च्या वतीने या वर्षी सुद्धा दिवाळीसाठी खाससुवर्ण भोगही मिठाई तयार करण्यात आली आहे.ही मिठाई मामरा बदाम, पिसोरी पिस्ता, काजू, शुद्ध केशर तसेच २४ कॅरट सोन्याचे वर्क लावून तयार करण्यात आल्याची माहिती रघुवीर मिठाईचे संचालक चंद्रकांत पोपट यांनीदिली





आपण प्रत्येक सण आणि आनंद एकमेकांना मिठाई देवून साजरा करतो आणि रघुवीरची मिठाई हा या आनंदाचा एक भाग आहे. या दिवाळीच्या निमित्ताने ग्राहकांसाठी सुवर्ण भोग नावाची सोन्याच्या वर्कने सजलेली खास दिवाळी स्पेशल मिठाई रघुवीर मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. सुवर्ण भोग मिठाई खास राजस्थानातील कारागीर बनवतात.ही मिठाई उच्च दर्जाचे मामरा बदाम, पिसोरी पिस्ता, काजू आणि शुद्ध केशर तसेच २४ कॅरेट सोन्याचे वर्क लावून तयार केली जाते. सुवर्ण भोग ही मिठाई देवी महालक्ष्मीला अर्पण केलेल्या प्रसादाच्या रूपात आहे, म्हणून या गोडाचे नाव सुवर्ण भोग आहे. सोन्याचे काम असलेले हे सुवर्ण भोग मिठाई रघुवीर मिठाई शाम चौक, रघुवीर रिफ्रेशमेंट राजापेठ, रघुवीर फूड झोन बडनेरा रोड, रघुवीर स्वीट गाडगे नगर, रघुवीर नमकीन आणि बेकर्स, सांगली आणि मिरज या रघुवीर च्या प्रत्येक शाखेत १४ हजार रुपये प्रति किलो दराने उपलब्ध आहे..

दिवाळीनिमित्त आकर्षक गिफ्ट हैम्पर्स प्रत्येक प्रकारात आणि प्रत्येक आकारात उपलब्ध आहेत. दिवाळीनिमित्त खास दिल्ली आणि मुंबईहून हे गिफ्ट बॉक्स मागवले जातात. ही आकर्षक गिफ्ट हैम्पर्स ही रघुवीरची ओळख आहे, शहरांतील तसेच शहरा बाहेरील ग्राहक विशेषतः येथे खरेदी करण्यासाठी येतात. रघुवीरला देश–विदेशातून या गिफ्ट हैम्पर्स च्या ऑर्डर्स मोठ्या प्रमाणात मिळतात, ही गिफ्ट हैम्पर्स रघुवीरची ओळख मानली जाते. गिफ्ट हैम्पर्स प्रती ग्राहकांची आवड पाहून रघुवीर बद्दलची लोकांची ओढ लक्षात येते.

यासोबतच रघुवीरच्या सर्व मिठाई आणि खाद्यपदार्थ उत्कृष्ट दर्जासाठी खास फूड टेक्नॉलॉजिस्टच्या देखरेखीखाली बनवले जातात. रघुवीरची मिठाई आणि नमकीन केवळ अमरावती किंवा शहराबाहेरच नव्हे, तर संपूर्ण राज्यात आणि देश–विदेशात प्रसिद्ध आहेत.

दिवाळीनिमित्त, रघुवीरकडून काही मिठाई ग्राहकांसाठी सादर करण्यात येत आहेत, ज्यात काजू बिस्किट, रोझ ब्लॉसम, मँगो ब्लॉसम, केसर ड्रायफ्रूट फ्लॉवर आणि अंजीर किंग सोबत काजू मिक्स, मावा मिक्स आणि गिफ्ट हॅम्पर्स मध्ये सर्व मिक्स मिठाईचा समावेश आहे. हे गिफ्ट हैम्पर्स रघुवीरच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे. तसेच इतर मिठाईंमध्ये स्पे. ड्रायफूड बॉल, स्पेशल गोल्डन पिस्ता, काजू कतली, काजू स्टिक, काजू बिस्किट, बदाम लाँच, पिस्ता लाँच, काजू आंबा कतली, काजू टरबूज, उपलब्ध आहेत.रघुवीरच्या मिठाईने सण साजरे करा, असे आवाहन पत्रपरिषदेत दिलीप पोपट, चंद्रकांत पोपट, नरेश पोपट, चिराग ठक्कर, निलेश पोपट, जयंतीभाई पोपट, जयेन्द्र तन्ना, निकीत तन्ना, चिराग तन्ना, प्रियेश पोपट, तेजस पोपट, मोहित पोपट, वसंत ठक्कर, गोपाल पोपट, नितिन पोपट, सुरेश वासाणी, शिवालाल पोपट, गजानन फणसे, सुशिल गोलचा, नानु बगडाई, मयुर उनटकट, राजुभाई (मोहम्मद आरिफ), विनय पोपट, कनैया बगडाई व पोपट कुटुंबीयांनी केले आहे.–

## बंडखोर माजी आमदार रमेश बुंदिले यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होणार

### भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांचा गंभीर इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८दर्यापूर:** महायुतीत कोणत्याही मतदारसंघातून बंडखोरी होऊ नये, यासाठी कटाक्षाने काळजी घेण्यात येत आहे. मात्र, पदाधिकारी, कार्यकर्ते बंडखोर उमेदवारांसोबत असल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. विशेषतः दर्यापुरातून माजी आमदार रमेश बुंदिले हे नामांकन अर्ज भरतील, तर त्यांच्यावरही पक्षाकडून कारवाई केली जाईल, असे निर्देश भाजपने जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांनी रविवारी अंजनगाव सुर्जी येथे केले. दर्यापूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार कॅप्टन अभिजित अडसूळबैठकीत मार्गदर्शन करताना भाजपचे यांच्या निवडणूक नियोजनसंदर्भात ही बैठक घेण्यात आली. यावेळी शिवसेना नेते तथा राज्य एससी, एसटी आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ व गुजरातचे आरोग्य मंत्री तथा भाजपचे जिल्हा प्रभारी ऋषिकेश पटेल यांच्या अध्यक्षतेत ही बैठक पार पडली.

जिल्हाध्यक्ष खा. डॉ. अनिल बोंडे व अन्य. यावेळी विशेष अतिथी म्हणून खासदार तथा



भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांची उपस्थिती होती. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी महायुतीचे उमेदवार कॅप्टन अभिजित अडसूळ यांना निवडून आणण्यासाठी आवाहन करण्यात आले. मात्र, जेपदाधिकारी बंडखोर माजी आमदार रमेश बुंदिले यांच्यासोबत त्यांचा नामांकन अर्ज भरण्यासाठी गेल्यास त्यांच्यावर पक्षाद्वारे शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. तसेच माजी आमदार रमेश बुंदिले यांच्यावरसुद्धा त्यांनी नामांकन अर्ज भरल्यास पक्षाद्वारे शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा इशारा भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. बोंडे यांनी दिला. महायुती बळकट करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची ठरली. यावेळी गुजरात राज्याचे भाजपचे प्रवक्ते परमार, शिंदेसेना जिल्हाप्रमुख गोपाल अरबट, शिवसेना सहसंपर्कप्रमुख रवी गणोरकर, डॉ. कविटकर, भाजपने जिल्हा सरचिटणीस विवेक गुल्हाने, भाजप विधानसभा प्रमुख गोपाल चंदन, भाजप ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष पद्माकर सांगोळे, शिवसेना संपर्कप्रमुख गजानन वाकोडे, भाजप तालुकाध्यक्ष संतोष काळे, शिवसेना अंजनगाव सुर्जी तालुकाप्रमुख नितीन चौखंडे, शिवसेना दर्यापूर तालुका प्रमुख महेंद्र भांडे, भाजप शहर प्रभारी नितीन पटेल, माजी तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर महाराज बाळू, अंजनगाव सुर्जी भाजप शहराध्यक्ष हेमा लेंधे, भाजप महिला जिल्हा सरचिटणीस विद्या गटेकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे विनोद दुर्गे, आदी उपस्थित होते.



# उमेदवारी अर्ज दाखल........



अमरावती विधानसभा मतदार संघातून मनसे उमेदवार पप्पू पाटील यांनी आज जोरदार शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला तर दर्यापूर विधानसभा मतदार संघातून युवा स्वाभिमान पक्षातर्फे माजी आमदार रमेश बुंदेले यांनी रवी राणा यांच्या उपस्थीतीत आपला उमेदवारी अर्ज भरला तर बडनेरा मतदार संघातून अपक्ष उमेदवार प्रिती बंड व नितीन कदम यांनी आपली उमेदवारी दाखल केली.

## ग्रामीण भागातील कार्यकर्ते पडले पेचात

### सोयाबीन काढणी : शेतात राबताहेत कार्यकर्ते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अचलपूर/मोर्शी**

सध्या रब्बी हंगामाची तयारी,सुरु आहे. त्यातच दिवाळी आणि विधानसभा निवडणुकाही आल्या आहेत. येत्या काही दिवसांत प्रचार रणधुमाळीलाही सुरुवात होणार आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांमध्ये आपल्या उमेदवाराच्या प्रचाराला जावे की, शेतातील कामे करावीत, अशा पेचात सध्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते पडले आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात सोयाबीन कहे पीक घेतल्या जाते. त्यामुळे सध्या शेतकरी कामात व्यस्त आहे.

ग्रामीण भागात सोयाबीनच्या काढणीसह रब्बी हंगाम सुरू आहे. त्यातच आता विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे.



शेती कामे सुरू असल्याने गावांमध्ये दिवसा शुकशुकाट राहत आहे. त्यामुळे दिवसा एखादा इच्छुक उमेदवार गावात भेटीसाठी आल्यास मोजकेच कार्यकर्ते उपस्थित राहत आहेत. त्यामुळे आलेल्या इच्छुक उमेदवारांच्याही गाठीभेटी होत नसल्याची स्थिती आहे.

गावागावात चर्चागावामध्ये सध्या सकाळी व सायंकाळी पारावर, कट्ट्यावर, सार्वजनिक ठिकाणी विधानसभा निवडणुकीच्या गप्पा रंगत आहेत. आतापर्यंत काही उमेदवार स्पष्ट झाले आहेत. मात्र, अन्य किती जण रिंगणात उतरतील हे स्पष्ट झालेले नाही. गावातील वातावरण हे दिवाळीच्या दिवसांत तापणार आहे. प्रत्येक जण आपापल्या परीने राजकीय अंदाज मांडत आहे. प्रत्येक कार्यकर्ता आपला पक्ष कसा प्रबळ आहे, हे पटवून देत आहे.

## बारा लाखांनी वाढली उमेदवार खर्चाची मर्यादा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

निवडणूक म्हटली की खर्च आलाच. निवडणूक आयोगाने खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत खर्चाच्या मर्यादेत वाढ केली असून उमेदवारांना ४० लाख रुपये खर्च करता येइल. यापूर्वी ही मर्यादा केवळ २८ लाख इतकी होती. त्यात १२ लाखांनी वाढ करण्यात आली आहे.

उमेदवारांना खर्चाचा हिशेब द्यावा लागणार आहे. अमरावती जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांत निवडणूक प्रचाराचा धुराळा उडणार आहे. नोव्हेंबरच्या सुरुवातीला दिवाळी झाल्यानंतर निवडणुकीचे मैदान मारणाऱ्या उमेदवारांच्या विजयाचे फटाके फुटणार आहेत.

**खर्चावर पथकांचा राहणार 'वॉच'**

निवडणुकीत पैशांच्या उधळ- पट्टीला लगाम लावण्यासाठी खर्च मर्यादा निश्चित केली जाते. त्यामुळे निवडणूक विभागाचे उमेद-वारांच्या खर्चाकडे विशेष लक्ष राहणार आहे. गत काही वर्षांत प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या वाडली आहे. महागाईतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे निवडणूक खर्चाची मर्यादा वाढावी, अशी मागणी विविध पक्षांनी केली होती. त्यामुळे निवडणूक आयोगाने खर्च मर्यादा वाढविल्याची माहिती आहे.

## इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा बाजारात धमाका; खरेदीसाठी साधणार दिवाळीचा मुहूर्त

### पाडव्याला पतीकडून पत्नीला भेट अन् भाऊबिजेला बहिणीला ओवाळणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

दिव्यांचा सण अर्थात दिवाळीला आता अवघे काही दिवस उरले असून, त्याची तयारी बाजारपेठेत दिसून येत आहे. पाडव्याला पतीकडून पत्नीला, तर भाऊबिजेला लाडक्या बहिणीला भावाकडून ओवाळणी स्वरूपात भेट वस्तू देण्यासाठी खरेदीची तयारी सुरू केली आहे. दहा हजारांपासून ते दोन-अडीच लाखांपर्यंत किमती असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी करताना दिसून येत आहेत.




दिवाळीच्या सणात दिलेली भेट ही केवळ परंपरा नसून प्रेम, आदर, आणि नात्यांचा सन्मान आहे. खरेदीतून फक्त वस्तूच नव्हे, तर आठवणी आणि नात्यांचे नवे धागे तयार होतात. प्रत्येक भेटीतून नवीन तंत्रज्ञानासोबत प्रेमाचा नवा सूरही घरात सामावतो.

**– गृहिणी**

हल्ली मोठमोठ्या दुकानांमध्ये अनेक प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू एकाच छताखाली मिळतात. त्यामुळे ग्राहकांची सोय होते. स्मार्ट टीव्ही, लॅपटॉप, स्मार्ट वॉच, मोबाइल, फ्रिज, वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह ओव्हन, इयरफोन या वस्तूंना यंदा विशेष मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.ईएमआय सिस्टममुळे महागड्या किमतीचे इलेक्ट्रॉनिक वस्तू घेणे सहज शक्य झाले आहे. याबरोबरच ई-कॉमर्स संकेतस्थळांवर खूप मोठ्या प्रमाणात ऑफर किंवा सणांच्या मुहूर्तावर अक्षरशः मोहात पाडणाऱ्या फेस्टिव्हल ऑफरसह विविध प्रकारचे - सेल सुरू असतात. बाय वन गेट वन यांसारख्या ऑफरमुळे ऑनलाइन शॉपिंगलादेखील प्रतिसाद मिळत आहे. असे असले तरीही दुकानात प्रत्यक्ष जाऊन, स्वतः पाहून, निरखून गॅजेट निवडणे; त्याच्या फीचर, वॉरंटीविषयी सेल्समनला खोदून विचारणा करून खरेदी करताना दुकानांमध्येही ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे.

## अभिजित अडसूळ करोडपती ४.६८ कोटींच्या संपतीची नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ दर्यापूर**

दर्यापूर विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये शिंदेसेनेचे उमेदवार अभिजित अडसुळ हे आतापर्यंत दाखल उमेदवारी अर्जात सर्वात श्रीमंत उमेदवार ठरले आहे. त्यांच्याकडे ४.६८ कोटींची जंगम अन् १५ कोटींची स्थावर मालमत्ता असल्याचे शपथपत्रातील नोंदीवरुन स्पष्ट झाले आहे. त्यांच्याकडे ४५० व पत्नीकडे ८०० ग्रॅम सोने आहे.

अडसुळ यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यासोबत त्यांनी शपथपत्र जोडले. त्यांच्याविरुद्ध एकही गुन्हा नाही. आयकर विवरणपत्रानुसार २०२४-२५ मध्ये त्यांचे वार्षिक उत्पन्न ३१,५१,६१० रुपये आहे. त्यांच्याकडे १,५७,५०० रुपये रोख आहे. बँक ऑफ बडोदा कांदिवली ९,२९,७५१ रुपये, एचडीएफसी, कांदिवली १,६६,४३७ रुपये, आयसीआयसीआय ३,६९,०९१ रुपये, एसबीआयमध्ये १७,९०,६५१



रुपये आहेत. बँक ऑफ बडोदामध्ये ५६,०३,५३८ रुपयांची मुदत ठेव आहे. युआरव्ही कन्सल्टन्सीमध्ये १,७६,९८२, युआरव्ही डेव्हलपर्समध्ये १,१३,०९,१७२ रुपयांची गुंतवणूक आहे. कृष्णकांत चतूर १ लाख, मित्र व नातेवाईकांकडून ८,०९४४२ रुपये, निमिषा गजाकोष २९ लाख, पारिजात कन्स्ट्रक्शन २६ लाख, कल्पेशन मिस्त्री १.३० कोटी, युआरव्ही डेव्हलपर्स १२.८६ लाख व युआरव्ही फुड २,०७,६५५ रुपयांची गुंतवणूक आहे. त्यांच्या मालकीचे १७ लाखांचे वाहन आहे.

**सातारा जिल्ह्यात शेत अन् मुंबई परिसरात प्लॅट**

सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यातील मौजा शिरंबे येथे ४१ लाखांचे शेत, कांदीवली पूर्व येथे दुकान (बाजारमुल्य २ कोटी), अंजनगाव येथे फ्लॅट, मौजे वाढवण, कांदीवली येथे कल्पतरू गार्डन येथे २ व कल्पतरू विएंता टॉवर येथे २ फ्लॅट एकूण मूल्य १५.१६ कोटी आहे. शपथपत्रातील नोंदीनूसार ५,१२,५८,१८० रुपयांचे कल्पतरू विएंता यांचे दायित्व आहे. अडसुळ यांच्या पत्नीकडे १,०६,७३,९५३ रुपयांची जंगम व ६० लाखांची स्थावर मालमत्ता आहे.

## आमदार देवेंद्र भुयार यांनी ए बी फॉर्मसह केला उमेदवारी अर्ज दाखल

### मोर्शी मतदार संघातील उमेदवारीचा तिढा अखेर सुटला : हजारो जनसामान्य कार्यकर्त्यांची उसळली गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मोर्शी**

महाराष्ट्रातील मोर्शी विधासभा मतदार संघ हा गेल्या सात दिवसांपासून हाय व्होल्टेजवर होता. महाविकास आघाडीसह महायुतीचा उमेदवार येथे निश्चित होत नव्हता मतदारसंघांमध्ये वेगवेगळे तर्क वितर्क लावले जात असतांना अखेर दिनांक २८ ऑक्टोंबर रोजी आमदार देवेंद्र भुयार यांनी एबी फॉर्म सहित अजित पवार गटाकडून महायुतीचा हजारो नागरिकांच्या उपस्थितीत उप विभागीय अधिकारी कार्यालय मोर्शी येथे उमेदवारी अर्ज दाखल केला.



## महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे उद्याला नामांकन दाखल करणार

### खा.अनिल देसाई व पक्षाचे वरिष्ठ नेते राहणार उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

बडनेरा विधानसभा मतदार संघातील लमहाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे आपला नामांकन अर्ज मंगळवार दि. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता दाखल करणार आहेत. महाविकास आघाडीमध्ये समाविष्ट सर्वच पक्षाच्या स्थानिक नेत्यांसह हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सुनील खराटे शक्तिप्रदर्शन करणार आहे.शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला बडनेरा मतदार संघ काबीज करण्यासाठी शिवसेनेसह महाविकास आघाडी सज्ज झाली असून बडनेरा मतदार संघात परिवर्तनाच्या लढाईला यानिमित्ताने प्रारंभ झाला आहे.नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी सुनील खराटे यांच्या समर्थनार्थ साईनगर बेनाम चौक स्थित महेश भवन येथे शिवसेना नेते खा.अनिल देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच खा. बळवंत वानखडे, यशोमती ठाकूर, बबलू शेखावत विलास इंगोले ,माजी खा.अनंत गुढे, माजी आ. प्रदीप वडनेरे,शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, महानगरप्रमुख पराग गुढधे,प्रा.डॉ. हेमंत देशमुख,अनिल जळमकर व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य मित्रपक्षांचे वरिष्ठ पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा मेळावा पार पडेल व त्यानंतर तेथून दुचाकी रॅलीस प्रारंभ होईल. ही दुचाकी रॅली महेश भवन, समर्थ हायस्कूल रवी नगर चौक, प्रभात कॉलनी,बालाजी प्लॉट,मुधोळकर पेठ रोड, कवर नगर चौक, फरशीस्टॉप, दस्तुर नगर चौक, हरीगंगा ऑइल मिल, संताजी नगर रोड,रंगोली हॉटेल या मार्गाने मार्गक्रमण करीत राजापेठ स्थित मुख्य कार्यालय येथे दुचाकी रॅली चा समारोप होणार आहे. त्यानंतर सुनील खराटे हे प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालय येथे नामांकन दाखल करतील.





# बच्चू कडूंच्या नामांकन रॅलीने भरली विरोधकांच्या छातीत धडकी

## हजारो कार्यकर्ते,दिव्यांग बांधव स्वयंस्फूर्तीने सहभागीविजयी भव ने गुंजला अचलपूर परिसर





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अचलपूर**

अचलपूर विधानसभा मतदार संघातील परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीचे अधिकृत उमेदवार व प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी सोमवारी हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत नामांकन दाखल केले.बच्चू कडू यांची आजची झालेली महारॅली विरोधकांच्या छातीत धडकी भरवणारी ठरली.कार्यकर्ते, शेतमजूर, शेतकरी,दिव्यांग बांधव,कामगारवर्गाने महारॅलीत स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन त्यांनी बच्चू कडू यांच्या विजयाचा संकल्प केला. वसुबारस हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा दिवस आहे आज वसुबारस या दिनाचे औचित्य साधून बच्चू कडूंनी आपला आज नामांकन अर्ज सादर केला.सकाळीच बच्चू कडू यांनी आपल्या बेलोरा येथील निवासस्थानी आई वडिलांच्या प्रतिमेचे पूजन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. त्यांनतर घरून बैलबंडीमधून स्वतःच जोडी हाकत आईच्या समाधीस्थळी जाऊन नमन केले.त्याठिकाणी वृक्षपूजन करून परिसरातील राजमाता अहिल्या होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन केले तसेच सर्व संत महात्मे व महापुरुषांना अभिवादन केले. प्रत्येक निवडणुकीत नामांकन दाखल करतेवेळी आई सोबत असायची त्यांचा आशीर्वाद घेऊन आपण नामांकन दाखल करायला जायचो मात्र यावेळी आई सोबत नसल्याने बच्चू कडू भावुक झाले होते. आई बाबांनी दिलेली शिकवण आणि आशीर्वाद यामुळेच आज लाखो प्रहार कार्यकर्ते घडले आणि हेच कार्यकर्ते आज माझ्यासोबत माझा परिवार म्हणून उभे आहेत असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीस प्रारंभ झाला असून उमेदवार शक्तीप्रदर्शन करून नामांकन अर्ज दाखल करत आहे.एकीकडे उमेदवारांच्या रॅलीकरिता गर्दी जमविण्यासाठी कार्यकर्त्यांची वानवा असतांना सोमवारी बच्चू कडू यांच्या महारॅलीत मात्र जनसागर उलटला होता. अचलपूरमधील गांधीपूल याठिकाणी सकाळपासून अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील कार्यकर्ते,दिव्यांग बांधव, कामगार, शेतकरी, शेतमजूर वर्ग उपस्थित झाला होता. जणू आपणच या विधानसभा क्षेत्राचे उमेदवार आहोत याच अविर्भावात प्रत्येक कार्यकर्ता स्वयंस्फूर्तीने सहभागी झाला होता. बच्चू कडू हे राज्यातील एक प्रभावी नेते असून मागील सलग विक्रमी चार वेळा ते या मतदारसंघातून अपक्ष निवडून आले आहेत. त्यांचा पक्ष सत्तेत असो किंवा नसो, परंतु राज्यातील शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगबांधव, महिला, इत्यादींच्या प्रश्नांसाठी सरकारला धारेवर धरून त्यांना नये देण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तेत सहभागी असतानाही पदाची तमा न बाळगता सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी थेट मुख्यमंत्र्याला भिडणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या रेटच्यामुळेच देशात पहिल्यांदाच महाराष्ट्रात दिव्यांग विभागाची निर्मिती झाल्याने त्यांना दिव्यांगांचे मसीहा म्हणून ओळखले जाते. आपल्या हटके आंदोलनांसाठीही ते परिचित आहेत. शहरातील प्रमुख मार्गावरून बच्चू कडू यांची जीप मधून महारॅली निघाली. ठिकठिकाणी महिलांनी बच्चू कडू यांचे औक्षण करून त्यांना विजयी भव चा आशीर्वाद दिला.नामांकन दाखल करतेवेळी शेतकऱ्याचे वाहन असलेल्या बैलबंडीमधून जाऊन त्यांनी त्यांनी नामांकन दाखल केले. यावेळी बल्लू जवंजाळ, प्रवीण पाटील, संजय तट्टे, राजेंद्र गोरले, हाजी रफिक शेठ, रहमान भाई, राजेंद्र येऊल, पुरुषोत्तमजी जाधव, प्रमोद ढेरे,अनिल पिंपळे, सतिश व्यास,संजय जैस्वाल, हरिचंद्र मुगल, बंटी काकरांनी, अंकुश जवंजाळ, मुझफ्फर हुसेन यांचे सह अचलपूर, चांदुर बाजार तालुक्यातील हजारो समर्थक, कार्यकर्ते उपस्थित होते.

> महायुती आणि महाविकासआघाडी या दोघांचीही कार्यकर्त्यांवर निष्ठा राहीली नाही आणि कार्यकर्तेही पक्षांवर निष्ठा ठेवायचे बंद झाले आहेत. त्यामुळे यावेळी महायुती आणि महाविकासआघाडी यांच्यात बिघाडी होणार आहे. परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून आम्ही जनतेला चांगला पर्याय देण्यासाठी निवडणुकीला सामोरे जात आहे. मतदारसंघात सर्वाधिक विकासनिधी खेचून आणल्याने तसेच शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, महिलांचे आशीर्वाद पाठीशी असल्याने माझा पाचव्यांदा ऐतिहासिक विजय निश्चित होणार.
>
> **–बच्चू कडू.**

# अमरावती विधानसभा निवडणुकीत दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा आणि जनजागृती उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने, अमरावती जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेत दिव्यांग मतदारांचा सहभाग वाढावा या उद्देशाने स्वीप (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन अँड इलेक्टोरल पार्टिसिपेशन) उपक्रमांतर्गत मतदार जनजागृती आणि सुविधा केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. याचे उद्घाटन स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या हस्ते करण्यात आले.

या केंद्रांत दिव्यांग मतदारांना मतदान प्रक्रियेबद्दल आणि उमेदवारांच्या चिन्हांची माहिती ब्रेल लिपीतून दिली जात आहे. अमरावती जिल्ह्यात दहा हजारांहून अधिक दिव्यांग मतदार आहेत, आणि त्यांना सुगम पद्धतीने मतदान करता यावे यासाठी विशेष सुविधा पुरवण्यात येणार आहेत. प्रत्येक दिव्यांग मतदारापर्यंत पोहोचून त्यांचे मतदान सुनिश्चित करण्याचा संकल्प स्वीप विभागाने व्यक्त केला आहे.

दिव्यांग मतदार नोडल अधिकारी जया राऊत यांनी सांगितले की, दिव्यांग मतदारांना मतदानाचा अनुभव सोपा आणि सुगम होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. या कार्यक्रमात सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर, सहाय्यक दिव्यांग नोडल अधिकारी मुद्गल, निरीक्षक पुरुषोत्तम शिंदे, तसेच अनेक दिव्यांग मतदार उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंकज मुद् गल यांनी तर सुत्रसंचालन संकेत पाटिल यांनी आभार पी.डी.शिंदे यांनी मानले,यावेळी जिल्हातील समाज कल्याण विभागाचे अधिकारी,कर्मचारी,दिव्यांग प्रतिनिधी उपस्थित होते.तसेच जिल्हा स्वीप कक्षाचे ज्ञानेश्वर घाटे,संजय राठी,निितन माहोरे,हेमंतकुमार यावले,राजेश सावरकर यांचे सहकार्य लाभले.

# महायुतीच्या उमेदवार सौ. सुलभाताई खोडके यांची २९ ऑक्टोबरला भव्य नामांकन रॅली

## महायुतीतील सर्व घटक पक्ष व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती विधानसभा मतदार संघ निवडणुकीतील महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.सुलभाताई संजय खोडके येत्या मंगळवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० वाजता संत गाडगेबाबा समाधी मंदिर गाडगे नगर येथून भव्य नामांकन रॅली निघणार असून यामध्ये महायुतीतील सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सर्व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राज्याच्या महायुती समन्वय समितीचे सदस्य संजय खोडके तसेच भाजपाचे शहराध्यक्ष तथा आमदार प्रवीणजी पोटे यांनी केले आहे.



अमरावती विधानसभा सभा मतदार संघाची निवडणूक येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार असून यामध्ये महायुती कडून विद्यमान आमदार सौ. सुलभाताई खोडके यांना उमेदवारी मिळाली आहे. त्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवीत असून त्यांच्या उमेदवारीमुळे अमरावतीमधील महायुतीमध्ये उत्साह संचारला आहे. निवडणुकीला कमी दिवस शिल्लक असल्याने आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी जनतेच्या भेटीगाठी व संवाद साधण्यासाठी झंजावती जनआशीर्वाद यात्रा सुद्धा सुरु केली असून याला जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद देखील लाभत आहे.महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.सुलभाताई संजय खोडके मंगळवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता संत गाडगे बाबा समाधी मंदिर प्रांगण येथून अमरावती विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाणार असून यावेळी महायुतीतील घटक पक्षाच्या प्रमुख नेत्यांची सुद्धा उपस्थिती राहणार आहे. तत्पूर्वी शहरातील मुख्य चौकांमधील थोर -महापुरुषांच्या पुतळ्याला देखील आ.सौ. सुलभाताई खोडके या अभिवादन करणार असून त्यानंतर त्यांची भव्य नामांकन रॅली अमरावती तालुका प्रशासकीय कार्यालय संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन जवळ येथे दाखल होणार असून त्याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिकृत ए-बी फॉर्म वर त्या आपली अधिकृत उमेदवारी दाखल करणार आहे. यावेळी महायुतीतील सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सर्व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राज्याच्या महायुती समन्वय समितीचे सदस्य संजय खोडके व भाजपाचे शहराध्यक्ष तथा आमदार प्रवीणजी पोटे यांनी केले आहे.

# ११ नोव्हेंबर पासून सुरू होणाऱ्या हिवाळी - २०२४ परीक्षा स्थगित

## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी २०२४ च्या दुस-या टप्प्यातील परीक्षा दि. ११ नोव्हेंबर, २०२४ पासून सुरू होणार होत्या व परीक्षांचे वेळापत्रक देखील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते, परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे सदर परीक्षा तुर्त स्थगित करण्यात आल्या असून या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. निितन कोळी यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे. यासंदर्भात परीक्षा विभागाकडून सर्व संलग्नित



महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्रांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून याची सर्वसंबंधित विद्यार्थी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावयाची आहे. तसेच काही अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक संचालक डॉ. नितीन कोळी यांचेशी ९८५००४२३५७ मो. क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.तिस-या टप्प्यातील परीक्षा नियमित घेण्यात येणार दि. २६ डिसेंबर, २०२४ पासून तिस-या टप्प्यातील परीक्षा सुरू होणार असून त्या परीक्षा यापूर्वी घोषित वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहे.

# ग्रामीण पोलिसांचे जिल्ह्यात रात्रभर मिशन ऑल- आऊट : विविध भागातून ५ सशस्त्र कुख्यात आरोपींना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

एसपी विशाल आनंद अॅण्ड टीममधील ७३ अधिकारी व ४४८ पोलिस कर्मचार्यांनी जिल्ह्यात रात्रभर मिशन ऑल- आऊटचे जंम्बो ऑपरेशन राबविले. या मोहिमे दरम्यान पोलिसांनी विविध भागातून ५ सशस्त्र कुख्यात आरोपींना अटक केली. तसेच पकड वॉरन्टच्या १६ आरोपींना पकडले. अवैध दारूच्या २३ केसेस करून तब्बल १ लाख ८५ हजाराची अवैध दारू जप्त केली. तसेच अचलपुर, परतवाडा, ब्राम्हणवाडा थडी व वरूड भागात अवैध गुटखा विक्रीच्या ५ केसेस करून सुमारे ९० हजाराचा गुटखा जप्त केला.

मिशन ऑल-आऊटमध्ये सर्वात आधी ग्रामीण पोलिसांनी फरार घोषित केलेला यवतमाळ येथील आंबडेनरगात राहणार्या - अशोक उर्फ मिनेश गुलाबराव इंगोले (२९) याला - चांदुर बाजार येथून अटक केली. त्यानंतर परतवाडा, अंजनगावसुर्जी, वरूड पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या पथकांनी शेख सादीक उर्फ चिचि शेख सलीम (२०), रा. खिरणी बगीचा, परतवाडा, राकेश गणेश शाहु (३०) रा.अजीतपुरा, अंजनगावसुर्जी दिलीप भिशन सिरसाम (३८), रा. तिवसा, ईक्बाल खान मेहबुब खान (४०) रा. मुघलाईपुरा, परतवाड यांना विविध भागात चाकूसहचाकूसह अंधारात अस्तित्व लपवून फिरतांना अटक करण्यात आली. मिशन ऑलआऊटमध्ये ग्रामीणच्या बहुतांश पोलिस ठाण्यातील समन्स- वॉरन्ट स्कॉडही सहभागी असल्याने स्कॉडमधील पोलिसांनी विविध पोलिसांना हवे असलेल्या वॉरन्टच्या १६ जणांना पकडून संबधीत पोलिसांच्या स्वाधीन केले. यासह पोलिसांनी प्रत्येक तालुका शहरातील हॉटेल, लॉज, धर्मशाळा सुध्दा चेक केल्या. बॉर्डर सिलिंग पाईन्टवरील नाकाबंदी दरम्यान विविध लहान-मोठ्या वाहनाची कसून तपासणी करण्यात आली. २३ अवैध दारू विक्रीच्या अड्ड्यांवर धाडी घालून पोलिसांनी १ लाख ८५ हजार रूपयांची अवैधदारू जप्त केली. त्याचप्रमाणे अचलपुर, परतवाडा, ब्राम्हणवाडाथडीव वरूड पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटख्याच्या ५ केसेस करून तब्बल ९० हजार ८०० रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला.

# धामणगाव मतदारसंघात ४७ कर्मचाऱ्यांना नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ धामणगांव रेल्वे**

धामणगाव रेल्वे विधानसभा निवडणूक प्रशिक्षणाला दांडी मारणाऱ्या ४७ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून समाधानकारक उत्तर न आल्यास थेट संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारवाईसाठी पत्र पाठवण्यात येणार आहे.

धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातील पहिले प्रशिक्षण दोन टप्प्यात शनिवारी ७५४ कर्मचाऱ्यांना देण्यात आले. यातील तब्बल १२ कर्मचारी या प्रशिक्षणाला अनुपस्थित होते, तर रविवारी ९७२ कर्मचाऱ्यांपैकी ३५ कर्मचाऱ्यांनी दांडी मारली होती. निवडणुकीसारख्या महत्त्वाच्या कामाला दांडी मारणाऱ्या एकंदरीत ४७ कर्मचाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी तेजश्री कोरे यांनी लोकप्रतिनिधित्व अधिनियमानुसार नोटीस बजावली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांची समाधानकारक उत्तरे दोन दिवसात अपेक्षित आहे.




# रेल्वेस्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर बंदी
## ८ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध; नागपूरसह सात स्थानकांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर**

दिवाळी, छटपूजेच्या निमित्ताने प्रवाशांची जागोजागच्या रेल्वेस्थानकावर प्रचंड गर्दी होणार आहे. त्यात प्रवाशांना सोडण्यासाठी येणाऱ्यांची आणखी भर पडू नये म्हणून मध्य रेल्वेने नागपूर, पुणे, मुंबईसह सात मोठ्या रेल्वेस्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरते निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता दि. ८ नोव्हेंबरपर्यंत प्लॅटफॉर्म तिकीट दिले जाणार नाहीत.

दिवाळी आणि छटपूजेच्या निमित्ताने मोठ्या रेल्वेस्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी होते. या गर्दीची संधी साधून समाजकंटक, चोर-भामटे सक्रिय होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठे नुकसान होते. एकीकडे प्रवाशांच्या गर्दीमुळे रेल्वेस्थानक परिसरात पाय ठेवायला, जागा नसताना आपल्या नातेवाइकांना सोडण्यासाठी किंवा त्यांना रेल्वेस्थानकावर घ्यायला येण्यासाठी अनेकजण येतात. परिणामी गर्दीत आणखीच भर पडते. तसे होऊ नये म्हणून गर्दीचे



नियंत्रण करण्यासाठी मध्य रेल्वेकडून विविध उपाययोजना करण्याचे ठरले आहे. त्यात फलाटावर सोडण्यासाठी किंवा घेण्यासाठी येणाऱ्यांना रोखण्याचाही एक उपाय आहे. त्यानुसार, राज्यातील निवडकप्रमुख रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू करण्यात आले आहेत. दि. ८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत हे निर्बंध राहणार आहेत. सणासुदीच्या काळात सुरळीत आणि सुरक्षित प्रवासासाठी प्रवाशांनी नियोजन करावे, असे आवाहन रेल्वेने केले आहे.

**खालील स्थानकांवर मिळणार नाही प्लॅटफॉर्म तिकीट**

मुख्य रेल्वेस्थानक नागपूर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर रेल्वेस्थानक, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे रेल्वेस्थानक, कल्याण रेल्वेस्थानक आणि पुणे रेल्वेस्थानकावर प्लॅटफॉर्म तिकीट मिळणार नाही.

**वृद्धांना, रुग्णांना सूट**

गर्दी टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने ही व्यवस्था केली आहे. मात्र, त्यातून ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना सूट देण्यात आली आहे. त्यांच्या मदतीसाठी येणाऱ्यांना हे निर्बंध लागू होणार नसल्याचे रेल्वेने कळविले आहे.













